# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०१६ / फाल्गुन २७, १९३७ ( शके )**

**(१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(२) आदिवासी विकास मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८२**

---

### राज्यात मराठा, मुस्लिम आणि धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(१) * १४७२५ श्री.संजय दत्त, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी : तारांकित प्रश्न क्रमांक २८३६ ला दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठा आणि मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील मराठा, मुस्लिम व धनगर आरक्षणाबाबत ॲडव्होकेट जनरल यांचे मार्गदर्शन घेऊन आरक्षण देण्यात येईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठा आरक्षणासंदर्भात संनियंत्रण करण्यासाठी मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने स्थापन केलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, वरील तिन्ही जातींना आरक्षण देण्याबाबत ॲडव्होकेट जनरल व मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने स्थापन केलेल्या समितीचा अहवाल सादर करण्यात आला आहेत काय,

(५) असल्यास, आरक्षण देण्याबाबत अहवालामध्ये कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाकडून होत असलेल्या विलंबामुळे या समाजातील नागरीकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(७) तसेच राज्यात मराठा, मुस्लिम आणि धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग तयार करुन त्या प्रवर्गांतर्गत १६ टक्के आरक्षण देण्याकरिता दि.९/७/२०१४ रोजी सन २०१४ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१३ काढण्यात आला व दि.१५/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग तयार करुन १६ टक्के आरक्षण देण्यात आले. दि.१४/११/२०१४ रोजी सदर अध्यादेशास व शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यामुळे याबाबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

तसेच मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याकरिता दि.९/७/२०१४ रोजी सन २०१४ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१४ काढण्यात आला व दि.१९/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मुस्लिम समाजाकरिता विशेष मागास प्रवर्ग-अ तयार करुन ५ टक्के आरक्षण देण्यात आले. मा.उच्च न्यायालयाने सदर अध्यादेशास स्थगिती दिल्यामुळे मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मराठा आरक्षणासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगितीच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्याकरिता करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे व इतर अनुषंगिक कार्यवाहीचे संनियंत्रण करण्यासाठी

मा.मंत्री, शालेय शिक्षण व उच्च तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे त्यामुळे सदर समितीने त्यांचा अहवाल शासनास सादर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) अशा प्रकारची समिती स्थापन करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) हे खरे नाही.

(७) मराठा समाजास १६ टक्के आरक्षण देण्याबाबतच्या अध्यादेशास व शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीकरिता दि.९/७/२०१४ पूर्वी शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास, अशा पदांवर मा.उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका करण्यात याव्यात असेही आदेश देण्यात आलेले आहेत.

मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण देण्याबाबतच्या अध्यादेश मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सदर अध्यादेश अस्तित्वात असेपर्यंत अबाधित ठेवण्यात आले होते. सदर अध्यादेशाचे कायदयात रुपांतर न झाल्याने व्यपगत झाला आहे. मुस्लिम समाजाचे ५ टक्के आरक्षणाचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

धनगर आरक्षणाबाबत टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस यांच्याकडून अंतिम संशोधन अहवाल अद्यापि अप्राप्त असून अहवाल प्राप्त झाल्यावर यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत मान्यता प्राप्त वसतिगृहातील अधिक्षकांना मानधन ऐवजी वेतनश्रेणी देण्याबाबत

**(२) * १४५९४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १३४७३ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या अनुदानित मान्यता प्राप्त वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबत शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदरहु कर्मचाऱ्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयाचे अनुषंगाने शासन आदेश निर्गमित करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) ते (५) सदर बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

-----------------

**पाथरी (जि.परभणी) येथे प्रभारी उपअभियंता यांनी गैरव्यवहार केल्याबाबत**

**(३) * १५०७९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथे प्रभारी उपअभियंता असलेल्या श्री.तरकसे यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी केवळ कागदोपत्रीच करण्यात आलेल्या या गैरकामाची चौकशी पुर्ण केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी दरम्यान काय निष्पन्न झाले व दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयातील पोलीस वसाहतींच्या दुरवस्थेबाबत

**(४) * १५८९१ श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील पोलीस वसाहती मधील शासकीय निवासस्थांनाची अत्यंत दुरवस्था झाली असून अनेक ठिकाणी रहिवाशांना मुलभूत सुविधा पासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय वसाहतीत राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी त्यांना आवश्यक नागरी सुविधा आणि निवास्थानाच्या दुरुस्तीची मागणी वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोडकळीस आलेल्या कालबाह्य इमारतीच्या जागेवर नविन इमारतीचे बांधकाम करुन पोलीस कर्मचाऱ्यांना आवश्यकतेप्रमाणे नविन निवासस्थाने उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहार व निवासस्थानाची दुरुस्ती याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) शासकीय निवासस्थानांच्या केलेल्या दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झालेला नाही, तथापि नवीन निवासस्थानांचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भालेर (ता.जि.नंदुरबार) याठिकाणी एमआयडीसीकरिता पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(५) * १६११९ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भालेर (ता.जि.नंदुरबार) याठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) घोषित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी एमआयडीसीसाठी कोणतीही पायाभूत सुविधा पुरविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त एमआयडीसीसाठी पायाभूत सुविधा करुन किती कालावधीत एमआयडीसी सुरु करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) मौजे भालेर (ता.जि.नंदुरबार) येथील औद्योगिक क्षेत्रासाठी २८५.५८ हे.आर सहकारी व ३५४.८३ हे.आर खाजगी असे एकूण ६४७.४१ हे.आर इतके क्षेत्र अधिसूचित करण्यात आले आहे. त्यापैकी, २८५.५८ हे.आर इतके सरकारी क्षेत्र महामंडाळाच्या ताब्यात आले असून उर्वरित खाजगी क्षेत्र ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच ताब्यात आलेल्या सरकारी क्षेत्राची मोजणीची कार्यवाही पूर्ण झालेली असून सर्व्हेक्षणाचे व सिमांकनाचे काम सुरु आहे व तापी नदीवरील प्रकाशा बंधाऱ्याच्या जलाशयातून ४.५० द.ल.घ.मी. पाण्याच्या आरक्षणाकरिता प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे पाठविण्यात आला असून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर औद्योगिक क्षेत्रासाठी रस्ता, जलवितरीका व कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या खर्चाच्या प्रशासकीय प्रस्तावास सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागास**
**शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(६) * १५४७७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये २११६ आणि २९१५९ अशा दोन शिर्षकाखाली (हेडखाली) शासनाकडून निधी येतो या निधीतून शासकीय इमारतींची दुरुस्ती तर दुसऱ्या शिर्षकामधून (हेडमधून) निवासी इमारतींची दुरुस्ती करण्यात येते, परंतू येथे दोन वर्षात अपुरा निधी आल्याने ज्या ठेकेदारांनी कामे केली आहेत ते आता आर्थिकदृष्टया अडचणीत आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील विकास कामासाठी निधी देण्याबाबत व कंत्राटदारांची बिले अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामध्ये आतापर्यंत रत्नागिरी जिल्ह्याकरिता लेखाशीर्ष २०५९ कार्यालयीन इमारती करीता रु.६२५.०७ लक्ष व २२१६ निवासी इमारती करीता रु.१६३.५० लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मागासवर्गीय (नॉनक्रिमिलेअर) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शिक्षण शुल्क सवलत देण्याबाबत**

**(७) * १४८२४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१४ मध्ये तत्कालीन मा. सामाजिक न्याय मंत्र्यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शिक्षण शुल्क (फी) सवलत मिळावी म्हणून रु.२,६०७ कोटीची तरतूद केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नॉन क्रिमिलेअर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी (स्कॉलरशिपसाठी) सदर सवलत दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शिक्षण शुल्क (स्कॉलरशिपसाठी फी) सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती साठी रुपये २६०७.०० कोटी इतकी मूळ तरतूद व पुरवणी मागणीद्वारे रुपये ४८५.०० कोटी अशी एकूण ३०९२.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) अनूसूचित जाती प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २.०० लाख पर्यन्त आहे. त्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व ज्यांचे उत्पन्न रुपये २.०० लाखापेक्षा जास्त आहे. त्यांना मॅट्रीकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू आहे.

विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रुपये १.०० लाख पर्यंत आहे त्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व ज्यांचे उत्पन्न रुपये १.०० लाख ते रुपये ४.५० लाखापर्यंत आहे. त्यांना मॅट्रीकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी मुलांना दिल्या जाणाऱ्या स्वेटर वाटपामध्ये दिरंगाई होत असल्याबाबत

**(८) * १४७०१ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.संजय दत्त, ॲड.अनिल परब, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.राजेंद्र जैन, श्री.रामराव वडकुते, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.महादेव जानकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कडाक्याच्या थंडीपासून स्वत:चा बचाव करता यावा यासाठी आदिवासी विकास विभागात विद्यार्थ्यांना स्वेटर पुरविण्याबाबतची निविदा माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान काढण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जानेवारी, २०१६ महिना संपत आला तरी आश्रमशाळेतील लाखो आदिवासी विद्यार्थ्यांना स्वेटर देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी मुलांना मिळणारे स्वेटर राज्य शासन आणि ठेकेदारांमधील अंतर्गत वादामुळे रखडले असल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दप्तर दिरंगाईमुळे थंडीच्या काळात स्वेटर न मिळाल्याने विद्यार्थी स्वेटर पासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, दुर्गम व अतिदुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना वेळेवर स्वेटर शासनाने कोणत्या उपाययोजना करणार आहे,
(६) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) सन २०१५-२०१६ मध्ये स्वेटर खरेदी प्रकरणात दराबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. तथापि शासन व ठेकेदारामध्ये अंतर्गत वाद उद्‌भवलेला नाही.

शासन निर्णय दिनांक ४/३/२०१४ नुसार शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर तीन वर्षातून एकदा वूलन स्वेटर देण्याची तरतूद आहे. त्यानुसार सन २०१२-२०१३ मध्ये स्वेटर पुरविण्यात आलेले आहेत.

सन २०१५-२०१६ या शैक्षणिक सत्रात ई-निविदेद्वारे वुलन स्वेटर खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली. सदर निविदेतील दराबाबत तक्रारी प्राप्त झाल्यामुळे व तोपर्यंत हिवाळा संपला असल्याने खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वुलन स्वेटर वेळेवर पुरविणेबाबत नियोजन करण्यात येत आहे.
(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागांतर्गत विशेष शाळांना अनुदान, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती आणि शिक्षकांना पगार देण्याबाबत

**(९) * १५०८४ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ७६६८ ला दिनांक २० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत विशेष शाळांना मान्यता व अनुज्ञाप्ती, शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या आणि ना हरकत प्रमाणपत्र तसेच नियमित करण्याच्या मान्यता विनाविलंब मिळाव्यात, इयत्ता दहावी-बारावी पर्यंतच्या शाळांना अनुदानित मान्यता द्यावी, सहाय्यक अनुदानाऐवजी अनुदान असे लेखाशिर्ष मिळावे आदी मागण्या शासनाच्या विचाराधीन आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंधत्व, अपंगत्व, कर्णबधीरता आणि स्वमग्नता अशी शारीरिक व मनोवैज्ञानिक आव्हाने असलेल्या विशेष मुलांच्या सर्व शाळांना सहाय्यक अनुदानाऐवजी शिक्षण विभागाच्या शाळांप्रमाणे अनुदान मिळावे आणि शिक्षकांना शालार्थप्रमाणे नियमित पगार मिळावेत अशी मागणी शिक्षक भारतीने आयुक्तांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विशेष शाळांमधील विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या शिष्यवृत्त्या थकीत असल्याची तक्रार संस्थांनी करुनही पैसे अदा करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर संस्थांना वेळेवर अनुदान, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती आणि शिक्षकांना पगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) विशेष शाळांना मान्यता व अनुज्ञाप्ती, शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या नियमित करणे आणि ना हरकत प्रमाणपत्र देणे याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

(२) होय.

(३) व (४) अपंग मुला मुलींची शिष्यवृत्ती मंजूर करणे, तसेच अपंग संस्थांचे थकीत वेतनेत्तर अनुदान अदा करण्याबाबत जुलैच्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली असून, त्यानुषंगाने थकीत शिष्यवृत्ती व थकीत वेतनेत्तर अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या भारत सरकार मेट्रिकोत्तर शिष्यवृत्तीबाबत

**(१०) * १५०१४ डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाविद्यालयातील विविध प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून दिल्या जाणा-या भारत सरकार मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) योजनेतील शिष्यवृत्ती प्राप्त करण्याबाबत गेल्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थी व विद्यालयांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नांदेड जिल्हयातील विदयार्थ्यांना समाज कल्याण विभागाकडून भारत सरकार शिष्यवृत्ती योजना लागू असून सदरच्या योजनेत विदयार्थ्यांना अभ्यासक्रम बदलून तो दुस-या अभ्यासक्रमास प्रवेश घेतांना मागील वर्षीची शिष्यवृत्ती शासनास समाज कल्याण विभागात जमा केल्याशिवाय त्यांना प्रवेश व त्या अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती दिली जात नसल्याने विदयार्थ्यांचे अतोनात नुकसान होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थी व विद्यालयांना मुदतीत फॉर्म भरता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शिष्यवृत्तीचे अर्ज (फॉर्म) भरण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत व उक्त संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) सन २०१५-१६ करिता शिष्यवृत्ती/शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत वेळोवेळी वाढविण्यात आलेली आहे. सध्या ही मुदत दिनांक १०/३/२०१६ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(११) * १५६४५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.आनंदराव पाटील** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्ग दिवसेंदिवस मृत्यूचा सापळा बनत असून या महामार्गावरील रायगड जिल्हयातील पोलीस कार्यक्षेत्राच्या हद्दीत मागील वर्षभरात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या दुरवस्थेमुळे ४९७ अपघात झाले आहेत, त्यामध्ये ९९ जणांचा मृत्यू व ६२४ जन जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर अपघात घडू नयेत यासाठी या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, रायगड जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई - पुणे द्रुतगती महामार्ग व मुंबई-पुणे जुना महामार्गावर वर्षभरात ८३६ अपघात होऊन २११ जणांचा मृत्यू तर ७२८ जण जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून वाढते अपघात रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गापैकी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे असलेल्या पनवेल ते इंदापूर ह्या ८४.०० कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणामधून मे. सुप्रिम पनवेल इंदापूर टोलवेज प्रा. लि. या सवलतकारामार्फत प्रगतीत असून कर्नाळा अभयारण्यातील २०.०० कि.मी. महामार्ग वगळून ६४.०० कि.मी. महामार्गाचे चौपदरीकरण ३१ मार्च, २०१६ पर्यत पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

इंदापूर ते झाराप ह्या उर्वरीत ३६६.१७ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मंजूर असून त्यावरील १२ पूल व २ रेल्वे उड्डाणपूलांची बांधकामे प्रगतिपथावर असून काम जुलै, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ह्या महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी सुरु असलेल्या भूसंपादनाच्या प्रगतीनुसार कामाचे १० पॅकेजमध्ये विभाजन करण्यात आले असून त्यापैकी ३ पॅकेजमधील १३४.७० कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत निविदा मागविण्यात आल्या असून काम पूर्ण करण्याचा कालावधी दोन वर्षांपर्यंत आहे. उर्वरीत ७ पॅकेजमधील २३१.४७ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी भुसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) होय.

(४) रायगड जिल्ह्यातून जाणा-या मुंबई-गोवा, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व जुना मुंबई-पुणे महामार्गावरील अपघात हे सर्वसाधारणपणे भरधाव वेग, अविचार, हयगय व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करणे, चुकीच्या वेळी व चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे, क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेणे इत्यादी कारणांनी झाले असल्याचे पोलीस अधिक्षक रायगड यांच्या अहवालात नमुद केले आहे.

मुंबई-गोवा महामार्गाची केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या वार्षिक योजनेतून रस्ते सुरक्षेविषयक कामे करण्यात आलेली आहेत.

मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील अपघात रोखण्यासाठी सुमारे १४ कि.मी. लांबीत हायटेन्साईल (ब्रायफेन) वायर रोप क्रॅश बॅरीयर जून, २०१४ मध्ये बसविण्यात आले आहे. २५ कि.मी. अपघातप्रवण लांबीमध्ये हायटेन्साईल वायर रोप क्रॅश बॅरीअर बसविण्याचे काम हाती घेण्यात आले असून घाटामध्ये दरडी कोसळून होणारे अपघात रोखण्यासाठी अँकर बोल्टिंकसह वायर रोप लावण्याचे काम प्रगतीत आहे. तसेच वाहतूक पोलिसांमार्फत विहीत वेग मर्यादेबाबत स्पिडगनद्वारे खात्री करुन अपघात रोखण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे.

दिनांक २३.०२.२०१६ रोजी सेव्ह लाईफ फाऊंडेशन, महिंद्रा ॲन्ड महिंद्रा यांचे समवेत मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग 'झिरो फॅटिलिटी' कॉरिडॉर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांनी सामंजस्य करार केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भूखंड उद्योजक भाड्याने देत असल्याबाबत**

**(१२) * १५१९९ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्दारा उद्योजकांना फक्त उद्योग सुरु करण्याकरिता भुखंड उपलब्ध करुन दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुखंड वाटप प्रक्रिया कशी आहे, वाटपानंतर प्रतिक्षा यादी केली जाते का, ज्यांना वाटप झाले त्यांनी किती वर्षात तेथे उद्योग सुरु केला पाहिजे,

(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योजकांना उद्योग सुरु करण्यास भूखंड उपलब्ध करून दिले परंतु उद्योग सुरु करण्या ऐवजी ते भूखंड भाड्याने देण्याचे प्रकार यवतमाळ येथे माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यवतमाळ एम.आय.डी.सी. मध्ये वाटप झालेल्या किती भुखंडावर प्रत्यक्ष उद्योग सुरु झाले आहेत, ज्यांनी स्वत: उद्योग भुखंडावर सुरु केला नाही त्यांनी किरायाने/भाडयाने इतर धंदयाकरिता दिले त्याची संख्या किती आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी नियम व शर्ती अटींचा भंग करून व अधिकाऱ्याच्या संगनमताने हे भूखंड भाड्याने देण्याचे प्रकार घडत आहेत, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार भूखंडाचे वाटप हे अर्जदाराचा प्रस्ताव, त्यांचे उदयोगाबाबतचे ज्ञान, उदयोजकता, अर्जदाराची आर्थिक तरतूद या बाबी तपासून क्षेत्रफळ व वर्गवारी निहाय भूखंड वाटप समितीच्या मंजुरीनंतर केले जाते. भुखंड वाटप समितीमध्ये शासनाच्या विविध विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असतो.

भूखंड मागणीच्या अर्जाची प्रतिक्षा यादी तयार केली जाते.

ज्यांना भूखंडाचे वाटप झाले आहे त्यांच्या सोबत करण्यात येणाऱ्या प्राथमिक करारनाम्यात विहीत कालावधीत म्हणजेच ५ वर्षात भूखंडात विकास केला पाहिजे अशी अट नमूद करण्यात येते.

(३) भूखंडधारकाने महामंडळाकडे भूखंड पोट-भाड्याने देण्याबाबत परवानगी मागितल्यास महामंडळाच्या धोरणानुसार भूखंडाचे बांधकाम पूर्ण झाले असल्यास भूखंडधारकाकडून विहीत शुल्क आकारुन भूखंड पोटभाड्याने देण्यास परवानगी देण्यात येते.

(४) यवतमाळ औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण १६२ भूखंडाचे वाटप करण्यात आले असून त्यापैकी १०६ भूखंडावर उत्पादन सुरु आहे, २ भूखंडधारकांनी नियमानुसार महामंडळाकडून परवानगी घेऊन भूखंड पोटभाड्याने दिलेले आहेत.

(५) हे खरे नाही.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आदिवासीच्या जमिनी नियमबाह्यरित्या विक्रीचा निर्णय रद्द करण्याबाबत**

**(१३) * १५६७५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक १२१५८ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महसूल अधिनियम - १९८८ च्या कलम ३६ 'अ' नुसार तसेच १९७५ च्या कायद्यानुसार आदिवासींच्या जमिनीचे बिगर आदिवासींना होणारे हस्तांतरण रोखण्याबाबत शासन नियुक्त समितीने त्यांचा अहवाल आदिवासी विकास विभागाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने सादर केलेल्या अहवालाच्या छाननीची सुरू असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरणाच्या परवानगी संदर्भाने पुढे कोणता निर्णय घेण्यांत आला आहे व महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ मध्ये कोणता बदल करण्यांत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आदिवासीच्या जमिनी खुल्या करण्याचा घेतलेल्या निर्णयाला राज्यभरातील लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कायद्यातील पळवाटेचा आधार देऊन आदिवासींच्या जमिनी धनदांडग्यांनी हडप केल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आल्यानंतर, माजी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जनजाती सल्लागार समितीची ४७ वी बैठक दिनांक ४ जानेवारी, २०१२ रोजी झाली, त्यानंतर विद्यमान मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाच्या परवानगीने आदिवासींच्या जमिनी, बिगर आदिवासींना हस्तांतरित करण्यात आल्यामुळे, मोठ्या प्रमाणावर आदिवासी भूमिहीन झाल्याची बाब दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजीच्या बैठकीत निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, माजी मुख्यमंत्री यांनी राज्यातील गेल्या दहा वर्षातील जमिनी हस्तांतरण प्रकरणाचा अहवाल सादर करण्याच्या दिलेल्या आदेशानुसार आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना हस्तांतरीत झाल्याची शेकडो प्रकरणे या अहवालातून निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(८) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आदिवासींचे जमिनीचे बिगर आदिवासींना होणारे हस्तांतरण रोखणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(९) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय. जनजाती सल्लागार परिषदेच्या ४८ व्या बैठकीत मा.राज्यपाल महोदय यांनी सूचविलेल्या विषयास अनुसरुन सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानूसार आदिवासींच्या जमिनींचे बिगर आदिवासींना होणारे हस्तांतरण रोखण्यासाठी इतर राज्यात अस्तित्वात असलेल्या अशा कायद्याची तपासणी करुन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मध्ये योग्य तो बदल करण्यासाठी शिफारशी सुचविण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या तत्कालिन अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिनांक १८/०५/२०१५ रोजी आदिवासी विकास विभागाकडे अहवाल सादर केला आहे.

(२) नाही.

सदर अहवालाची छाननी सुरु आहे.

सदर अभ्यास समिती अहवालाच्या शिफारशी छाननीअंती पुढील निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रस्तुत प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालावर निर्णय होईपर्यंत आदिवासींच्या जमिनींचे बिगर आदिवासींना हस्तांतरण करण्याबाबत शासन स्तरावर प्राप्त झालेली तसेच मान्यतेसाठी सादर झालेली तथा सदर प्रकरणी अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही अशी सर्व प्रकरणे तुर्तास स्थगित ठेवण्याबाबत व त्यावर कोणताही निर्णय न घेणेबाबत जनजाती सल्लागार परिषदेच्या ४८ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार निर्णय घेण्यात आलेला आहे.

तथापि काही प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकान्वये विहित मुदतीत निर्णय घेण्यास शासनास निदेश दिलेले आहेत, अशी प्रकरणे महसूल विभागामार्फत निर्णयित करण्यात येत आहेत.

दरम्यानच्या कालावधीत आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना हस्तांतरणास परवानगी देणेबाबत व न देण्याबाबत राज्यभरामध्ये मा. लोकप्रतिनिधी व इतरांची निवेदने शासनाकडे प्राप्त झालेली आहेत.

(४) अंशत: खरे आहे.

मा. मुख्यमंत्री हे जनजाती सल्लागार परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष असतात. तत्कालिन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जनजाती सल्लागार परिषदेची ४७ वी बैठक दिनांक ०४ जानेवारी, २०१२ रोजी व ४८ वी बैठक दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४ रोजी पार पडली आणि विद्यमान मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याचे प्रस्तावित आहे.

(५), (६), (७) व (८) दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी या विषयी बैठक झाली नाही.

तथापि, महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीन प्रत्यार्पित करणे अधिनियम, १९७४ आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ व ३६-अ मधील तरतूदीनुसार नियमबाह्यरित्या हस्तांतरीत झालेल्या आदिवासींच्या जमिनी परत करण्याची तरतूद आहे.

(९) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नुकसानाला जबाबदार ठरलेल्या संचालक व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१४) * १६१७६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नुकसानाला जबाबदार ठरलेल्या संचालक व अधिकाऱ्यांकडून १०० कोटी रुपये पेक्षा जास्त वसूली असल्याने येथील ठेवीदार त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेचा कालबध्द कार्यक्रम आणि कलम ८८ च्या अहवालानंतर नुकसानीबद्दल दोषी ठरलेल्या संचालकाकडून वसूली झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेवीदारांचे पैसे परत देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वयेच्या चौकशीमध्ये बँकेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्या बँकेच्या तत्कालीन संचालकांवर रुपये २६.४३ कोटी व अधिकारी/कर्मचा-यांवर रुपये ५.३४ कोटी असे एकुण रुपये ३१.७७ कोटी रक्कमेची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असुन सदर रक्कम त्यांचेकडून येणे बाकी आहे.

(२) अंशत: खरे आहे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वयेच्या अहवालात बँकेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्या संचालक व अधिकारी/कर्मचा-यांविरुध्द निश्चित केलेल्या एकूण रु.३१.७७ कोटी पैकी रु.५.७० कोटी वसूली बँकेने केलेली आहे. उर्वरीत आर्थिक नुकसानीची रक्कम कृती आराखडा तयार करून संबंधीताकडून सक्तीने वसूली करणेबाबत कलम ७९(१) अन्वये दि.२९.२.२०१६ रोजी बँकेस निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) बँकेच्या ठेवीदारांच्या ठेवी संबंधीताना परत करण्याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर कार्यालयाचे पत्र दि.०६.११.२०१५, ०७.०१.२०१६ व २९.०२.२०१६ अन्वये बँकेस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घोडेगाव (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील आदिवासी आश्रमशाळेत वॉटर प्युरीफायर व रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पाचे काम बंद असल्याबाबत**

**(१५) * १६०७५ श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांसाठी वॉटर प्युरीफायर व रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प बसविण्याचे काम घोडेगाव (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयामार्फत यंत्रणा बसविण्याची योजना सन २०११ मध्ये मंजूर झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ठेकेदाराला सदरहू काम देण्यात आले होते, त्या ठेकेदाराने हे काम पूर्ण केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विरोधात स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी घोडेगाव (ता.आंबेगाव, जि.पुणे) पोलीस ठाण्यात माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांनी प्रस्तुत प्रकरणी उज्वल आदिवासी सेवा संस्था, जळवंडी उसरान, ता.जुन्नर, जि.पुणे या संस्थेविरुद्ध दिनांक १/१/२०१६ रोजी घोडेगांव (ता.आंबेगाव, जि.पुणे) पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १/१६, भा.दं.वि. कलम ४२० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी अपचारी संस्थेविरुद्ध प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांनी घोडेगांव (ता.आंबेगाव, जि.पुणे) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलेला असून फौजदारी कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**इगतपुरी (जि. नाशिक) येथील क्रीडा प्रबोधिनी व नंदुरबार येथील मध्यवर्ती क्रीडा केंद्राचे काम सुरु करणेबाबत**

**(१६) * १४९३४ श्री.जयवंतराव जाधव, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२६७२ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता इगतपुरी (जि, नाशिक) येथे क्रीडा प्रबोधिनी व नंदुरबार येथे मध्यवर्ती क्रीडा केंद्र स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २००९ रोजी शासनाने घेवूनही माहे जानेवारी २०१६ पर्यंत सदर प्रबोधिनीचे काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी जानेवारी, २०१५ मध्ये आयोजित देश पातळीवरील २२ व्या आदिवासी सांस्कृतिक एकता महासंमेलन प्रसंगी बोलतांना मा.मंत्री (आदिवासी विकास) महोदयांनी इगतपुरी आणि नंदुरबार येथे आदिवासी खेळाडूंसाठी स्वतंत्र क्रिडा अकादमी उभारण्याचे आश्वासन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी खेळाडूंच्या क्रीडा गुणांना चालना देण्यासाठी राज्यातील त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, नंदुरबार येथे स्वतंत्र क्रीडा अकादमी उभारण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी मा.आदिवासी विकास मंत्री महोदयांना दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रबोधिनीच्या बांधकाम आराखडा व अंदाजपत्रकांना राज्य क्रीडा समितीने मान्यता देवूनही शासनाच्या दिरंगाईमुळे सदर कामे सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर क्रीडा प्रबोधिनी तात्पुरत्या स्वरूपात क्रीडा विभागाच्या नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुलात सुरू करण्यात आलेली आहे.

सदर क्रीडा प्रबोधिनीत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच एकलव्य शाळांमधील Sports Specific Test मध्ये पात्र ठरलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. सदर विद्यार्थ्यांना तज्ञ क्रीडा प्रशिक्षकांमार्फत दररोज विविध क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अपंगाच्या विनाअनुदानित शाळेमधील शिक्षकांना नियुक्तीच्या दिनांकापासून अनुदान प्रदान करण्याबाबत

**(१७) * १५२६३ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत अंध, मतिमंद, मुक-बधीर आणि अस्थिव्यंग विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेले विनाअनुदानित शाळांना शासनाने दिनांक १० ऑक्टोबर, २००२ पासून अनुदान तत्वावर मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९२-९३ पासून या शाळांवर कार्यरत असलेल्या हजारो शिक्षकांना नियुक्ती दिनांकापासून मान्यता न देता अनुदान सुरु झाल्याच्या दिनांकापासून मान्यता प्रदान करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) अनुदान सुरु झाल्याच्या दिनांकापासून मान्यता दिल्यामुळे सदरहू शिक्षकांची सन १९९२-९३ पासूनची १० वर्षांची सेवा वाया जाऊन पेंशनमध्ये आर्थिक नुकसान सोसावे लागणार आहे, त्यामुळे त्यांनी नियुक्ती दिनांकापासूनची विनाअनुदानित सेवा पेंशनसाठी ग्राह्य धरण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) याप्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास पत्र पाठवून त्यांना न्याय देण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) होय.

(५) व (६) शासन निर्णय दिनांक १.३.१९८४ अन्वये अपंगांच्या अनुदानित शाळेमधील कर्मचाऱ्यांची अनुदान तत्वावर मान्यता दिल्यानंतरची सेवा सेवानिवृत्तीसाठी ग्राह्य धरली जाते, विना अनुदानित सेवा ग्राह्य धरली जात नाही.

-----------------

## ग्रुप ग्रामपंचायत नाते (ता.महाड, जि.रायगड) येथील पुलाच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) * १४९९५ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११९०३ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रुप ग्रामपंचायत नाते (ता.महाड, जि.रायगड) येथील काळोसे ते नाते गाव जोडरस्ता पुलाच्या कामास शासनाने सन २००८ मध्ये मंजूरी प्रदान करून अंदाजित रक्कम रुपये एक कोटी अठ्ठावीस लाख इतक्या रकमेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम माहे डिसेंबर, २०१२ मध्ये सुरु करण्यात येऊन सद्यस्थितीत ४० टक्केच काम पूर्ण झाले असून उर्वरित ६० टक्के काम सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संदर्भिय प्रश्नाच्या उत्तरामध्ये नमूद केल्यानुसार, सदर कामास आता नाबार्डकडून अंतिम मंजुरी प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केव्हा व सदर कामासाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) होय.

(४) सदर काम २०१६ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात अर्थसंकल्पित करण्यात येईल. तद्नंतर काम तातडीने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## पालघर जिल्हयातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(१९) * १५६४९ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील अनुक्रमे वसई-विरार शहरातंर्गत तसेच वाडा, जव्हार, मोखाडा आणि विक्रमगड या ठिकाणच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रातील प्रमूख वाहतूकीच्या रस्त्यांची अवस्था दयनिय झाल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग रस्ते आणि महानगरपालिकाने या रस्त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सामाजिक संघटनेने निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यातील खड्डे आणि त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) वसई-विरार शहरांतर्गत तसेच वाडा, जव्हार, मोखाडा आणि विक्रमगड येथील रस्त्यावरील खड्डे डिसेंबर २०१५-२०१६ च्या रस्ते दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत माहे जानेवारी, २०१६ अखेर पर्यंत डांबरमिश्रित खडीने भरुन रस्ते वाहतुकीस सुरळीत करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी विकास महामंडळात साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२०) * १४८२० श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास महामंडळातील संचालक मंडळाच्या बैठकीत पाईप लाईन खरेदी, साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याची तक्रार संचालकांनी सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आत्करगाव (ता.खालापूर, जि.रायगड) येथे डी.पी.सी.एल. कंपनीमध्ये लागलेल्या आगीबाबत**

**(२१) * १४९२३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आत्करगाव (ता.खालापूर, जि.रायगड) येथील डी.पी.सी.एल.कंपनी गेल्या दीड वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास या बंद असलेल्या कंपनीस आग लागली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आगीचे कारण काय आहे,

(४) कंपनीस अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरातील जनतेमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यात अशा बंद कंपन्यांमध्ये आगी लागु नये म्हणून शासनाने कोणती सुरक्षेची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) खोपोली पोलीस ठाणे यांचे दिनांक ३/१/२०१६ च्या पंचनाम्याप्रमाणे कंपनी बाहेरील परिसरातील सुकलेल्या गवताला आग लागून ती पुढे सरकत कंपनीत ठेवलेल्या ऑईल केमिकल्सच्या ड्रमपर्यंत पोहचली व आग लागली.

पोलीस अधिक्षक, रायगड यांनी कळविल्यानुसार आगीमुळे कंपनीच्या आजुबाजूच्या परिसरातील जनतेमध्ये कोणत्याही प्रकारे घबराटीचे वातावरण नाही. राज्यात दिनांक ६/१२/२००८ पासून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवनसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अंमलात आलेले आहेत. या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये इमारतीचा मालक किंवा भोगवटदार यांची इमारतीमध्ये किंवा इमारतीच्या भागामध्ये अग्निशमन अधिनियम, २००६ च्या अनुसूची एक मध्ये दर्शविलेल्या आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना आणि किमान अग्निशमन यंत्रणा यांची तरतूद करण्याची तसेच सदर यंत्रणा नेहमी दुरुस्त आणि कार्यक्षम स्थितीत ठेवण्याची जबाबदारी आहे.

पोलीस अधिक्षक, रायगड यांच्या कार्यालयाकडून अधिक तपास सुरु आहे.

-----------------

**मुंबई व पुणे महामार्गावर अपघाताच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत**

**(२२) * १५५२८ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व पुणे या दोन शहरांना जोडणारे प्रमुख दोन मार्गावर सन २०१५ मध्ये या मार्गावर ३३९ हून अधिक अपघात होऊन १३६ हून अधिक लोक गंभीर जखमी होऊन ते अपंग झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावर सध्या वाढत असलेले अपघात रोखण्याबाबत व अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटूंबाला व जखमींना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) सर्वसाधारणपणे जे अपघात मानवी चूकांमुळे व वाहनातील तांत्रिक बिघाडामुळे होतात त्यांना शासन निर्णयाप्रमाणे त्याची नुकसान भरपाई लागू होत नाही. खालापूर तालुक्याच्या हद्दीतील मौजे आडोशी तालुका खालापूर मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर दिनांक १९/७/२०१५ रोजी १२.०० वाजण्याच्या दरम्यान दरड कोसळून झालेल्या अपघातात मृत्यू पावलेल्या ४ व्यक्तींना शासनामार्फत प्रत्येकी चार लाख रुपये मदत देण्यात आली आहे व जखमींसाठीच्या उपचाराचा खर्चही करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) मानसरोवर कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण येथील संस्थेच्या नोंदणीबाबत**

**(२३) * १५७७० श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील मानसरोवर कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण या संस्थेच्या नोंदणीसाठी बिल्डरचे असहकार्य या सदराखाली सहनिबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांच्याकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास रितसर अर्ज केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर तत्कालीन सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको नवी मुंबई यांनी बिल्डरशी संगनमत करून संस्थेच्या प्रवर्तकांना कोणतीही बाजू मांडण्यास संधी न देता दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी प्रस्ताव नाकारण्यात आल्याबाबतची लेखी तक्रार लोकप्रतिनिधींनी मा.सहकार मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

मा.आ.डॉ.सुरेश (भाऊ), खाडे, मिरज, सांगली यांनी शासनाकडे केलेली तक्रार प्राप्त झाली आहे. सदरची तक्रार ही नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणी संदर्भातील असून, नोंदणी विषयक अटी/शर्तीची पुर्तता झाली नसल्याने नोंदणी अधिकारी, सहनिबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांनी दिनांक २२.०९.२०१५ रोजीचे आदेशान्वये सदरचा प्रस्ताव नाकारण्यात आला आहे. सदरची कार्यवाही ही अर्धन्यायिक स्वरुपाची असल्याने सदर आदेशाविरुद्ध सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे आवश्यक आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात वनार्टी स्थापन करण्याबाबत**

**(२४) * १४६३० श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे अर्थात ‘बार्टी’ ह्याच धर्तीवर भटक्या विमुक्तांसाठी स्वतंत्रपणे वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात ‘वनार्टी’ स्थापन करण्याबाबत वेगवेगळ्या संघटनामार्फत होत असलेली मागणी व भटक्या विमुक्तांच्या मोर्च्यातूनही मागणी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसंतराव नाईक स्वावलंबन योजना ही कर्मवीर दादासाहेब गायकवाड योजनेच्या धर्तीवर राबविण्याबाबत होत असलेली मागणी व या संदर्भात दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास आझाद मैदान, मुंबई येथे भटक्या विमुक्तांच्या मोर्च्या मधून हि मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, उक्त संदर्भात शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) उक्त निवेदनातील मागण्या विविध विभागांशी संबंधित असल्याने त्यावर कार्यवाही करण्याबाबत त्या विभागांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सत्ताधारी युती शासनामधील मंत्र्यांच्या दालनांचे सुशोभिकरण करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केल्याबाबत

**(२५) * १४७७९ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सत्ताधारी युती शासनामधील तब्बल १५ कॅबिनेट व राज्यमंत्र्यानी फर्निचर व विद्युतीकरणावर सुमारे २ कोटी रुपयांचा खर्च केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्वीच्या मंत्र्याच्या दालनांचे सुशोभिकरणाची खरोखरच गरज होती का, असा सवाल सामान्य प्रशासन विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्याला केला आहे, त्यामुळे कंत्राटदारांची बिले खोळंबली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी खुलासा करुन सदर कंत्राटदारांची बिले अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. अशी कोणतीही बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही.

नवीन मंत्रीमंडळ स्थापनेनंतर मा.मंत्री महोदयांच्या मागणीनुसार दालनाच्या फर्निचर व विद्युतीकरणासह नुतनीकरणाची स्वतंत्र अंदाजपत्रके सामान्य प्रशासन विभागाकडे माहे डिसेंबर, २०१४ व जानेवारी, २०१५ मध्ये रु.२०७.८२ लक्ष (स्थापत्य-१७४.६१ लक्ष, विद्युत- ३३.२१ लक्ष) सादर केली आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

(३) सामान्य प्रशासन विभागास मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. दरम्यान रु.५५.४९ लक्ष रक्कमेची देयके उपलब्ध अनुदानातून अदा करण्यात आली आहेत. उर्वरित देयके अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे कुरखेड (ता.शेगाव, जि.बुलढाणा) हे गाव मुख्य रस्त्यास जोडणेबाबत**

**(२६) * १६५९० श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुरखेड (ता.शेगाव, जि.बुलढाणा) हे गांव स्वातंत्र काळापासून मुख्य रस्त्याला जोडले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या गावाला जोडणारा जलंब ते कुरखेड हया रस्त्याचे काम ५ वर्षापुर्वी सुरु झाले होते व एकुण ३.५ कि.मी. पैकी ३.१ कि.मी. पर्यंत काम डांबरीकरणासह पुर्ण झाले आहे व केवळ ४०० मीटर काम अपुर्ण, आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील रस्त्याचे काम केव्हा पुर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर काम आवश्यकतेनुसार निकष व निधीची उपलब्धता झाल्यानंतर हाती घेण्यात येईल.

-----------------

**नाकोडा (ता.कळवण, जि.नाशिक) येथील आदिवासी वसतिगृहातील विद्‌यार्थ्यांच्या सोयी सुविधाबाबत**

**(२७) * १६६५४ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाकोडा (ता.कळवण, जि.नाशिक) येथील आदिवासी वस्तीगृहात सोयी-सुविधांचा अभाव असणे, जेवणाचा दर्जा निकृष्ट असणे, शालेय साहित्य वेळेवर मिळत नसणे, इत्यादी त्रुटीबाबत संतापलेल्या विद्‌यार्थ्यांनी कळवण येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयासमोर माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान ठिय्या आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) सदर वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी दिलेल्या निवेदनानंतर प्रकल्प अधिकारी, कळवण यांच्यामार्फत दि.१४.०१.२०१६ वस्तीगृहाची पाहणी करुन वसतिगृहातील सोयी-सुविधा, शैक्षणिक साहित्य, सकस भोजन याबाबत आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेनुसार, प्रकल्प कार्यालयामार्फत स्टेशनरी, बेडींग साहित्य, क्रीडा साहित्य, क्रमांक पुस्तके, वॉटर फिल्टर इत्यादींचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

भोजन पुरवठाधारकास भोजनाचा दर्जा सुधारण्याबाबत नोटीस देण्यात आलेली होती. त्यानुसार भोजनाच्या दर्जामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत अन्न, धान्य वाहतुकीचे विशिष्ठ कंपन्यांना जास्त दराने कंत्राट दिल्याबाबत**

**(२८) * १६६९९ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत करण्यात येत असलेल्या अन्नधान्य वाहतूकीचे कंत्राट जास्त दरात काही विशिष्ट कंत्राटदरांना देवून कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार करण्यात येत असल्याच्या तक्रारी मा.मुख्यमंत्र्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान चौकशीचे आदेश देवूनही आजमितीस कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रिय वखार महामंडळामार्फत (सीडब्लूसी) अन्नधान्याची वाहतूक करताना देत असलेले वाहतूकीचे दर आणि राज्य वखार महामंडळ देत असलेले दर यामध्ये मोठया प्रमाणावर फरक असून सीडब्लूसी वाहतूकीसाठी टनामागे १४६ रूपये वाहतूकीसाठी देत असताना राज्य वखार महामंडळ टनांमागे सरासरी ८०० रुपये देते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत अन्नधान्याची वाहतूक करण्याच्या कंत्राटामध्ये कोटयवधी रूपयांचे गैरव्यवहार झाला असून प्राथमिक माहितीनुसार वर्षाकाठी दिलेली सुमारे रुपये ५०० कोटीची कंत्राटे वादात सापडली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संपूर्ण गैरव्यवहाराची चौकशी करून शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) तक्रार प्राप्त झाली आहे व तक्रारीची तपासणी चालू आहे.
(२) हे खरे नाही. निविदेमधून महामंडळास आलेले वाहतूकीचे दर हे CWC व FCO च्या दराच्या सर्वसाधारण जवळपास आहेत.
(३), (४) व (५) निविदा प्रक्रियेच्या संबंधात आलेल्या तक्रारीची शासन स्तरावरुन तपासणी सुरु आहे. तपासणीतील निष्कर्षावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**नंदुरबार जिल्हयातील शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळण्याबाबत**

**(२९) * १७०९६ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्हयातील शासकीय वसतिगृहात जवळपास ६०० विद्यार्थी प्रवेश मिळण्यापासून वंचित राहिल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय वसतिगृहात ६०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) नाही.

तथापि, नंदुरबार जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहातील एकूण मान्य संख्या २७५ असून त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेले आहेत, त्यामुळे ६०० विद्यार्थी प्रवेश मिळण्यापासून वंचित राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे येथील रुपी सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहाराबाबत**

**(३०) * १७१६१ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील रुपी सहकारी बँकेच्या पूर्ण झालेल्या चौकशीचा अहवाल, चौकशी अधिकारी, पणन संचालक, श्री.किशोर तोष्णीवाल यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास,वृत्तपत्र माध्यमांकडे जाहिर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,पुणे येथील रुपी सहकारी बँकेतील आर्थिक अनियमितता व गैरव्यवहार याबाबत सुरु असलेली चौकशी पूर्ण होऊन त्या बँकेच्या १४ संचालकांसह ५४ अधिकारी दोषी असल्याचे निदर्शनास आले आहे व त्यांच्याकडून सुमारे १५०० कोटी रूपयांची वसूली करण्यात यावी, अशी शिफारस अंतर्भूत असलेला चौकशी अहवाल सादर झालेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००६ नंतर निवडून आलेल्या संचालकांपैकी ज्या संचालकांनी गैरव्यवहार केला असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत किंवा या बँकेवर प्रशासक आणण्याकरिता २००६ नंतर निवडून आलेले जे संचालक दोषी आढळले आहेत अशाची चौकशी श्री.किशोर तोष्णीवाल यांनी केली आहे काय,

(४) असल्यास, या चौकशी अहवालाचे स्वरूप काय आहे व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही,

प्राधिकृत अधिकारी श्री. तोष्णीवाल यांनी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या कार्यालयाकडे चौकशी अहवाल सादर केला आहे. चौकशी अहवाल सादर केल्याची माहिती वृत्तपत्र माध्यमांना दिली आहे.

(२) अंशत: खरे आहे,

रुपी बँकेच्या ८७ पदाधिकारी/ अधिकारी व कर्मचारी यांच्यावर बँकेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी रु. १४९०.६१ कोटी निश्चित केलेली आहे.

(३) नाही,

सन १९९७ ते २०१३ या कालावधीतील बँकेतील अनियमिततांची तपासणी श्री. डी. एन. काळे, विशेष लेखापरिक्षक यांनी केली असून त्यानुसार कार्यवाही चालु आहे.

(४) व (५) चौकशी अहवालानुसार बँकेच्या आर्थिक नुकसानीबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चीत केली आहे. संबंधितांकडुन वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८ अन्वये वसुली प्रमाणपत्र निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३१) * १७२२१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील रस्त्यांची जडवाहतूकीमुळे प्रचंड दुरवस्था झाली असून रस्त्यांखालील जलवाहिन्या वारंवार फुटत आहेत तसेच अपघाताच्या प्रमाणातही वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावरील अपघातांना आळा घालण्यासाठी बाह्यवळणाचे काम करून पुणे महामार्ग आणि विजापूर महामार्ग जोडणाऱ्या बाळे ते हत्तुर ते बोरामणी या हैद्राबादला जोडणाऱ्या महामार्गाचे काम त्वरीत पूर्ण करणे गरजेचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्याचा आराखडा तयार केला आहे परंतू निधीअभावी तो प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पाला मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सोलापूर शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ वरील कि. मी. २४१/००० ते २४२/००० ह्या लांबी दरम्यान जानेवारी, २०१६ मध्ये जुनी जलवाहीनी फुटल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे.

सोलापूर महानगरपालिकेकडून रस्त्याच्या क्षतिग्रस्त पृष्ठभागाची दुरुस्ती करुन रस्ता पूर्ववत करण्यात आला आहे. सदर रस्त्याची जडवाहतूकीमुळे दुरवस्था झालेली नाही.

(२) सोलापूर शहरातून जाणारी जड वाहतुक सुरळीत होण्याच्यादृष्टीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणातर्फे NHDP Phase III अंतर्गत सोलापूर-विजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. १३, कि. मी. ०/००० ते ११०/५४२ चे चौपदरीकरणाच्या प्रकल्पांतर्गत सोलापूर शहराच्या दक्षिण-पश्चिम बाजूस (South-West) बाळे ते हत्तुर हा २१/००३ कि.मी. इतक्या लांबीचा बाह्यवळण रस्ता मंजूर आहे.

हत्तुर ते बोरामणी या राष्ट्रीय महामार्ग क्र. १३ ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ यांना जोडणा-या प्रस्तावित बाह्यवळण रस्त्याचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्यावतीने सन २०११ मध्ये प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असुन अद्याप मंजुरी प्राप्त झालेली नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), सोलापूर यांनी कळविले आहे.

(३), (४) व (५) हत्तुर ते बाळे ह्या २१.००३ कि.मी. बाह्यवळण रस्त्याचा काही भाग माळढोक अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातून जात असल्याने राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडून मंजुरी मिळण्यास विलंब झाल्याने बाह्यवळण रस्त्याच्या बांधकामासाठी नव्याने निविदा निश्चितीची कार्यवाही प्रगतीत असून निधी अभावी काम रखडलेले नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

-----------------

**धुळे जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी प्रकल्पांतर्गत आदिवासींच्या विकासासाठी शासनाकडून आलेला निधी खर्च करण्याबाबत**

**(३२) * १७२६१ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी प्रकल्पांतर्गत आदिवासींच्या विकासासाठी सन २०१२ ते २०१५ या दरम्यान शासनाकडून आलेला १५० कोटी रुपयांचा निधी खर्च केला नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या तपासणी पथकाने हा निधी अखर्चित राहिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत शासनाचे कोणत्याही प्रकारचे निर्देश नसतानासुध्दा काही अधिकाऱ्यांनी नियमबाह्य पध्दतीने स्वतंत्र बँकेत खाते उघडून निधी तसाच ठेवला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी, धुळे कार्यालयाच्या तपासणी पथकाने प्रकल्प अधिकारी, धुळे यांच्या कार्यालयात दिनांक १८.०६.२०१५ ते २९.०६.२०१५ या कालावधीत लेखापरिक्षण केले. त्यावेळी रु.२७,६४,६२,९९५/- इतकाच निधी अखर्चित होता. मात्र सदर पथकाच्या अहवालात सन २०१२-२०१३ ते २०१४-२०१५ अखेर खालीलप्रमाणे निधी त्या त्या वर्षाअखेरीस अखर्चित असल्याचे दर्शविलेले आहे :-

| | | |
|---|---|---|
| मार्च, २०१३ अखेर | - | रु.४१,४७,४८,४७८/- |
| मार्च, २०१४ अखेर | - | रु.४४,८०,९३,१७३/- |
| मार्च, २०१५ अखेर | - | रु.६२,६९,३४,३०६/- |
| मे, २०१५ अखेर | - | रु.२७,६४,६२,९९५/- |

मार्च, २०१३ व मार्च, २०१४ अखेरचा अखर्चित निधी हा पुढील त्या त्या आर्थिक वर्षामध्ये खर्च करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

प्रकल्प कार्यालय, धुळे यांचे सर्व आर्थिक व्यवहार हे आहरण व संवितरण अधिकारी, भारतीय स्टेट बँक, ट्रेझरी शाखा, धुळे (खाते क्र. ३२६४५६४२७२२) या एकाच खात्यातून केले जातात.

(३) अपर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक या कार्यालयाच्या स्तरावरुन चौकशी करता त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती.

समितीचा चौकशी अहवाल आयुक्तालयास दिनांक ०३.०३.२०१६ रोजी प्राप्त झाला असून त्यानुसार प्रकल्प अधिकारी, धुळे यांच्याकडून खुलासा मागविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण आर्थिक महामंडळाचे होत असलेले नुकसान**

**(३३) * १७५८४ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण आर्थिक महामंडळाला चुकीच्या धोरणामुळे १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान सोसावे लागत असल्याबाबत माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात लेखापरिक्षकांच्या अहवालावरुन निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे-कुर्ला संकुलातील हाऊसफिन भवन या महामंडळाच्या मालकीच्या इमारतीतील पाच मजले सन २००० ते २०१७ या कालावधीकरिता भाड्याने देण्याचा निर्णय शासनाने घेतला, सदर निर्णयामुळे महामंडळाचे ४० ते ५० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चर्चगेट येथील वाशानी चेंबर्समधील दहा हजार चौरस फूटाचे कार्यालय गेली १४ वर्षे बंद स्थितीत ठेवल्याने या कालावधीत मिळणाऱ्या ३५ ते ४० कोटी रुपये भाड्यालाही महामंडळ मुकले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हाऊसफिन एम्प्लॉईजचे श्री.दिनकर देसाई यांनी या महामंडळावर प्रशासक नेमण्यात यावा अशी लेखी मागणी सर्व तक्रारींसह मा.सहकार मंत्री, मा.मुख्यमंत्री व सहकार आयुक्तांकडे १५ ते २० वेळा केली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या महामंडळातील गैरव्यवहार व चुकीच्या धोरणामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची चौकशी करुन त्यास जबाबदार असलेल्या अधिकारी, कर्मचारी व संचालक यांचेविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

सदर निर्णय शासनाने घेतलेला नसून संस्थेच्या संचालक मंडळाच्या दिनांक १३.२.२००१ रोजीच्या सभेतील ठरावान्वये घेण्यात आला आहे.

यासंदर्भात हाऊसफिन इमारतीचे ५ ते ९ मजले भाड्याने देण्याच्या सदोष करारामुळे संस्थेचे सुमारे ४६.३३ कोटीचे नुकसान झाल्याचे विशेष लेखापरिक्षण सहकारी संस्था, (फिरते पथक) मुंबई यांच्या अहवालात नमूद आहे.

(३) अंशत: खरे आहे,

(४) होय,

(५) बांद्रा कुर्ला संकुलातील हाऊसफिन भवन या इमारतीतील भाडेपोटीच्या झालेल्या नुकसानीबद्दल विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (फिरते पथक), मुंबई यांच्या अहवालास अनुसरुन कलम ८३ ची चौकशी करण्यात येईल.

वाशानी चेंबर्स संदर्भात कलम ८८ अन्वये फेर चौकशीसाठी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे.

प्रशासक नियुक्ती संदर्भात मा.उच्च न्यायालयातील दाव्याच्या निकाला संदर्भात पाठपुरावा करण्यात येईल व त्या अनुषंगाने प्रशासक नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोवंडी बुध्दनगर को-ऑप हौसिंग सोसायटीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३४) * १७५९३ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोवंडी बुध्दनगर को-ऑप हौसिंग सोसायटी या सोसायटीवर शासनाने नेमणूक केलेल्या श्री.तुळशीदास कृष्णा सन्नके यांनी सोसायटीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.तुळशीदास कृष्णा सन्नके यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत संबंधित सोसायटीने सहनिबंधक सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे) बांद्रा यांचेकडे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करून तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. तथापि, संस्थेकडून प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने प्रशासक कालावधीचे फेरलेखापरीक्षण करण्यासाठी शासकीय लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) होय, संस्थेकडून दिनांक ११.०१.२०१६ रोजी तक्रार प्राप्त झालेली आहे.
(३) संस्थेच्या तक्रारीनुसार प्रशासक कालावधीतील व्यवहारासंदर्भात शहानिशा करण्यासाठी शासकीय लेखापरीक्षकांची फेरलेखा परीक्षणासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोईसर तारापूर (जि.पालघर) औद्योगिक परिसरात**
**अनधिकृत झोपड्या उभारण्याबाबत**

**(३५) * १७९८२ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर तारापूर (जि.पालघर) औद्योगिक परिसरात माल वाहतूक वाहनांसाठी असलेल्या पार्किंगच्या राखीव भूखंडावर अनधिकृतपणे परराज्यातील नागरिकांनी झोपड्या उभारल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून अनधिकृत झोपड्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. तथापि, महामंडळाच्या माल वाहतूक वाहनांसाठी असलेल्या भूखंडावर अनधिकृत झोपड्या उभारल्याचे निदर्शनास आल्यानंतर दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी सदर झोपड्या हटवून भूखंड मोकळा करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील चारही टोल नाक्यावर वाहनाच्या नोंदीमध्ये तफावत असल्याबाबत**

**(३६) * १८१४१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील चारही टोल नाक्यावर शासनाने माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान वाहनाच्या नोंदणीची सर्वेक्षण केले होते, त्याच वेळी टोलच्या कंत्राटदाराने ही केले होते या दोघाच्या सर्वेक्षणात ५० टक्क्याहून अधिक नोंदीची तफावत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या टोल नाक्यांचे मागील दहावर्षापासून लेखापरिक्षण झाले नाही, हे ही खरे काय,

(३) असल्यास, या सर्वेक्षणाचा अहवाल केव्हापर्यंत सादर करणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

माहे जुलै, २०१५ मध्ये महामंडळामार्फत व्हिडिओग्रॅफिक सर्व्हे करण्यात आला होता. या मार्गावर वेगवेगळ्या टप्यांसाठी वेगवेगळे दर निर्देशित आहेत. वाहनधारक एका नाक्यावर योग्य टप्यासाठी पथकर देऊन दुसऱ्या पथकर नाक्यावरुन Exit Ramp द्वारे बाहेर जाऊ शकतात. या प्रवासात दुसऱ्या पथकर नाक्यावर पथकर द्यावा लागत नाही. त्यामुळे प्रति दिन पथकर भरुन जाणाऱ्या व व्हिडिओ रेकॉर्डिंग मध्ये समाविष्ट वाहनांची सरासरी संख्या यामध्ये तफावत आढळून येते. वाहनांच्या नोंदीची तफावत या कारणाने तसेच राज्य सरकार ने निर्देशित केलेल्या टोल मध्ये सूट असणाऱ्या वाहनांमुळे आहे.

(२) होय, सदर पथकर वसुलीचे कंत्राट रु.९१८ कोटी अग्रीम भरणा करुन घेऊन १५ वर्षांच्या सवलतीच्या कालावधीसाठी (securitization basis) देण्यात आले आहे. लेखा परिक्षणाची बाब मंजूर निविदेत अंतर्भुत नसल्याकारणाने सदर पथकर नाक्यांचे लेखा परिक्षण करण्यात आलेले नाही,

(३), (४) व (५) व्हिडिओग्रॅफिक सर्व्हेचा अहवाल अ.मु.स. (सा.बां.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीस सादर करण्यात आला आहे. समितीचा अहवाल शासनास सादर झाल्यावर पुढील कार्यवाही येईल.

-----------------

**आखाडा, बाळापूर (जि.हिंगोली) येथील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(३७) * १८४१७ श्री.सुभाष झांबड, श्री.जर्नादन चांदूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडा, बाळापूर (जि.हिंगोली) येथील विविध भागामधील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली आहे काही भागातील रस्ते व नाल्यांवरील झापे यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने येथील रस्त्यांची व नाल्यांवरील झापे यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) आखाडा-बाळापूर-शेवाळा प्रजिमा-९ रस्त्याची गावभागातील क्षतीग्रस्त लांबीतील रस्ता सुधारण्याचे काम नाबार्ड-२० योजने अंतर्गत मंजूर आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक २८.१०.२०१५ रोजी देण्यात आले असून सद्य:स्थितीत बाळापूर गावातील सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम व डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील बाजार समितीतील आडत रद्द करण्याच्या निर्णयाबाबत**

**(३८) * १४५८७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२६७७ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बाजार समितीतील आडत रद्द करणे संदर्भात सर्व संबंधित प्रतिनिधींच्या गठीत करण्यांत आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत अहवालातील शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने बाजार समितीतील आडत रद्द करणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) समितीस अडत रद्द करण्यासंबंधीचा विषय अभ्यासासाठी दिलेला नव्हता. अडत कोणाकडून वसूल करावी या संबंधीत प्राप्त अहवालावर अद्याप निर्णय प्रक्रिया पुर्ण झालेली नाही.

-----------------

## मराठवाडयातील रस्ते दुरूस्तीसाठी व पाथरी-सोनपेठ रस्त्यांसाठी निधी मिळणेबाबत

**(३९) * १५०४१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १४००६ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील १५५०० कि.मी. रस्त्यावरील खड्डयांच्या दुरूस्तीसाठी २००० रूपये कोटींची मागणी औरंगाबाद येथील मुख्य अभियंता यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आराखडयाव्दारे सादर केली आहे, हे खरे आहे काय ,

(२) तसेच, पाथरी सोनपेठ या रस्त्याच्या कामासाठी ५० कोटी रूपयांचा निधी देण्याबाबतची मागणी परभणी-हिंगोली जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी अप्पर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मुंबई यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निधी शासन स्तरावरून मंजुर करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी मराठवाड्यातील रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी व रस्त्याच्या इतर किरकोळ दुरुस्तीसाठी साधारणत: रुपये ४०० कोटी इतक्या निधीची मागणी शासनाकडे केली आहे.

(२) अशा आशयाचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे. सदर राज्यमार्ग क्र.२२१ हा रस्ता परभणी जिल्हयातील पाथरी व सोनपेठ या तालुक्यातून जातो. सदर रस्त्याच्या सुधारणेसाठी रुपये २० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

(३) रस्ते परिरक्षण व दुरूस्तीसाठी औरंगाबाद प्रादेशिक विभागास रुपये २६९ कोटी इतकी तरतूद वितरीत करण्यात आलेली आहे. तसेच प्रश्नांकित राज्य मार्ग क्र. २२१ या रस्त्यावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी खड्डे भरण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**समाजकल्याण विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या**
**शिष्यवृत्तीपासून विद्यार्थी वंचित असल्याबाबत**

**(४०) * १६०९६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५२२ ला दिनांक २० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११५५८ महाविद्यालयातील १३,३६,५७१ विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाची शिष्यवृत्ती माहे जानेवारी, २०१६ पर्यंत शैक्षणिक सत्रात मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाने कोणतेही शैक्षणिक शुल्क घेऊ नये असे शासन निर्देश असतानाही केवळ शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्यास विलंब होत असल्याने अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसुल केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, वि.जा.भ.ज.व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१५-१६ शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती केव्हा मिळणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून दोषींविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) आयुक्त, समाजकल्याण, पुणे व संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांच्यास्तरावरून वेळोवेळी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क योजनेचे अर्ज तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये झालेला कोट्यावधी रुपयांच्या गैरव्यवहार

**(४१) * १८६२५ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळोदा व धुळे या तालुक्यात आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये अंदाजे ३० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या एकूण २९ प्रकल्प कार्यालयांपैकी प्रकल्प कार्यालय, गडचिरोली येथे माहे डिसेंबर, २०१४ व प्रकल्प कार्यालय, तळोदा येथे माहे जुलै, २०१५ मध्ये शिष्यवृत्ती गैरव्यवहाराची प्रकरणे निदर्शनास आल्याची बाब खरी आहे.

(२) अंशत: खरे आहे.

तळोदा प्रकल्प कार्यालयात भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेंतर्गत रू. ८,७९,३७,०५०/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. तथापि, धुळे प्रकल्प कार्यालयांतर्गत शिष्यवृत्ती गैरव्यवहाराच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.

(३) उक्त घटना निदर्शनास आल्यानंतर प्रकल्प अधिकारी, गडचिरोली व प्रकल्प अधिकारी, तळोदा यांना तसेच त्या कार्यालयातील संबंधित लिपीक यांना निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच दोषी संस्थांविरूद्ध F.I.R. दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच राज्यात इतर ठिकाणी अशा प्रकारे गैरव्यवहार झाल्याची शक्यता ग्राह्य धरून आदिवासी विकास विभाग तसेच इतर विभागांतर्गत शिष्यवृत्ती प्रकरणांची चौकशी करण्याकरिता मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार गृह विभागामार्फत दि. १५.०१.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष चौकशी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर विशेष चौकशी पथकामार्फत प्रस्तुत प्रकरणांची सखोल चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**काळुस्ते (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४२) * १५४९८ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळुस्ते (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील शासकीय आश्रमशाळेच्या हलगर्जीपणामुळे एका विद्यार्थ्याला वेळेत उपचार न मिळाल्याने केवळ ताप येऊन त्याचा जिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित आश्रमशाळेचे अधिक्षक व शिक्षक यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

कु.रामदास झुगरे, इ. ८ वीच्या विद्यार्थ्यास दिनांक २८/०९/२०१५ रोजी दुपारी ताप आल्याचे लक्षात येताच त्यास त्याच दिवशी प्राथमिक आरोग्य केंद्र काळुस्ते येथे दाखल करुन वैद्यकिय उपचार करुन डॉक्टरांनी ग्रामीण रुग्णालय, घोटी येथे नेण्यास सांगितले. त्यास त्याच दिवशी ग्रामीण रुग्णालय घोटी येथे

उपचारासाठी दाखल केले. तेथील डॉक्टरांनी उपचार करुन पुढील उपचारांसाठी ग्रामीण रुग्णालय, नाशिक येथे पाठविले. तथापि त्यानंतर दिनांक २९/०९/२०१५ रोजी जिल्हा रुग्णालय नाशिक येथे औषधोपचार सुरू असतांना सकाळी १०:०० वाजता त्याचा मृत्यू झाला.

(२) या प्रकरणी सदर शाळेचे मुख्याध्यापक, अधिक्षक व वर्गशिक्षक यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या होत्या. तथापि त्यांचा खुलासा स्विकारार्ह असल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उस्मानाबाद येथील जिल्हा बँकेत शेतकऱ्यांच्या पीक विम्यासाठी शासनाकडुन आलेली रक्कम राज्य बँकेचे कर्ज फेडण्यासाठी वापरण्यात आल्याबाबत**

**(४३) * १६३५३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद येथील जिल्हा बँकेत शेतकऱ्यांना पीक विम्यासाठी शासनाकडुन आलेल्या ४६ कोटींपैकी ४० कोटींची रक्कम पीक विम्यासाठी न ठेवता परस्पर राज्य बँकेचे कर्ज फेडण्यासाठी वापरण्यात आल्याचा प्रकार उस्मानाबाद जिल्हा बँकेने केल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून सदर जिल्हा बँकेच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही,

(३) लागू नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील परूळे-चिपीतील शेतक-यांच्या जमिनी खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४४) * १४६८६ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयायतील परूळे-चिपीतील शेतक-यांच्या जमिनी एमआयडीसीने खाजगी बाजारभाव १० ते १५ हजार प्रति गुंठा असताना ती शासकीय बाजारभावानुसार प्रति गुंठा ३०० ते ८०० रुपये एवढया नाममात्र दराने विमानतळासाठी २६० हेक्टर जमिनी खरेदी केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळाच्या विस्तारासाठी आणखी ९०० हेक्टर जमिनीची आवश्यकता असल्याने महसुल विभागाने त्या जमिनीच्या सातबारावर सदर जमीन शासनाशिवाय अन्य कुणाला विकता येणार नाही, असे बजावत पेन्सिल शेरा मारण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेन्सिल शेरा असलेल्या जमिनीचे व्यवहार शेरा उठविल्याशिवाय होणार नसल्याचे शासनाने जाहिर केले असताना सदर पेन्सिल शेरा असलेल्या शेकडो एकर जमिनीचे खरेदीचे व्यवहार करण्यात आल्याने महसुल विभागाचा पेन्सिलने केलेला गैरव्यवहार दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार परूळे-चिपी येथील ग्रामस्थांची फसवणुक करुन त्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने विकत घेत कोट्यवधी रुपये लाटणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ला तालुक्यातील मौजे चिपी, कर्ली व परुळे येथील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार अधिसूचित करण्यात आल्या असून कलम ३३(३) नुसार सन १९९९ च्या शिघ्रसिध्द गणकाचे दर पायाभूत मानून त्यांचा मुल्यांकन निवाडा करण्यात आलेला आहे.

(२), (३), (४) व (५) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला औद्योगिक क्षेत्रातील मौजे चिपी-परुळे, कर्ली येथील ९३३.९२.४७ हे.आर खाजगी क्षेत्र दिनांक ३/५/२००७ रोजी अधिसूचित करण्यात आले होते. तथापि सदर क्षेत्रास संबंधित शेतकऱ्यांचा विरोध असल्याने शासनाने दिनांक ९/७/२०१३ च्या अधिसूचनेन्वये संपूर्ण क्षेत्र विनाअधिसूचित करुन जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना महसूली अभिलेखात आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांच्यामार्फत दिनांक १८/८/२०१३ रोजी पेन्सिल शेरा कमी करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याच्या विकासाच्यादृष्टीने प्रकल्पांचे नियोजन करण्याबाबत**

**(४५) * १५०१३ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण अशा सुमारे ५२ हजार कोटी रुपयांच्या आठ पायाभूत सुविधा प्रकल्पांना पुनर्रचित पायाभूत सुविधा समितीने तत्वत: मंजूरी दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पात ठाणे-घोडबंदर रस्त्यावर सुमारे ४ कि.मी.चा उन्नत मार्ग उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर, मुंबई सुपर कम्युनिकेशन हायवे या रस्त्याच्या आखणीस मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पांचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने दिनांक ३०/११/२०१५ च्या बैठकित महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुमारे रु.४३०४५/- कोटीच्या आठ पायाभूत सुविधा प्रकल्पांना तत्वत मंजूरी दिली आहे.

(२) होय.

वरील उल्लेखित दिनांक ३०/११/२०१५ मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीमध्ये घोडबंदर ते गायमुख या ३.९९५ कि.मी. लांबीच्या उन्नत मार्गाच्या कामाला प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे.

(३) होय, वरील उल्लेखित दिनांक ३०/११/२०१५ च्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीमध्ये पाच प्रादेशिक विभागास जोडणाऱ्या नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन द्रुतगती मार्गाच्या कामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित केलेले आहे.

(४) उपरोक्त प्रकल्पाचे सुसाध्यता अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या कामासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत व पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माथाडी कामगार राज्यभर आंदोलन करणार असल्याबाबत**

**(४६) * १५५५४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कांदा बटाट्यासह अन्य शेतमाल एपीएमसीच्या नियमनातून मुक्त केल्यास राज्यात उग्र आंदोलन करण्याचा इशारा माथाडी नेते, स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने असा निर्णय घेतल्यास संबंधित सर्व माथाडी कामगार राज्यभरात चक्काजाम करणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी विविध विक्रिचे पर्याय उपलब्ध करून जास्तीत जास्त भाव मिळावा यासाठी भाजीपाला, फळे व कांदा बटाटे नियमनमुक्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने माथाडी कामगार व लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करण्यासाठी दिनांक १७/२/२०१६ रोजी मा.मंत्री (पणन) यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यात सर्व पक्षीय व हितसंबंधीतांच्या प्रतिनिधींसोबत पुन्हा एकदा चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या कर्ज वाटपाबाबत

**(४७) * १५२२९ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महाराष्ट्र राज्य वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची समाजाच्या आर्थिक विकासाकरिता स्थापना केली, हे खरे काय,

(२) सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात ह्याकरिता किती नागरिकांनी अर्ज केले आहे,

(३) असल्यास, महामंडळ व बँकेमार्फत किती लाभार्थ्यांना किती रक्कम कर्ज वाटप झाले आहे व कर्मचारी वर्गाची वेतनाची रक्कम किती आहे

(४) कर्जवाटप केले नसल्यास गेल्या अनेक महिन्यांपासून कर्ज वाटप न करण्याची कारणे कोणती आहेत,

(५) शासन विविध कार्यात अमाप पैसे खर्च करत असतांना स्वंयरोजगाराकरिता निधी उपलब्ध न करण्याची कारणे कोणती आहेत,

(६) शासनाने या संदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) सन २०१४-२०१५ मध्ये एकूण ४३२३ अर्जदारांनी व २०१५-२०१६ मध्ये एकुण ३९७० अर्जदारांनी अर्ज केले आहेत.

(३) (अ) सन २०१४-२०१५ मधील विविध योजनांअंतर्गत कर्ज वितरणाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रु.लक्ष)

| लाभार्थी | महामंडळाचा सहभाग | बँकेचा सहभाग | वेतनावरील खर्च |
|---|---|---|---|
| १६७४ | ९४५.०० | २१०० | ४३६.०८ |

(ब) सन २०१५-२०१६ मध्ये विविध योजनांअंतर्गत कर्ज वितरणाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रु.लक्ष)

| लाभार्थी | महामंडळाचा सहभाग | बँकेचा सहभाग | वेतनावरील खर्च |
|---|---|---|---|
| ३३६ | २१०.०० | ४७१ | ६०६.३९ |

(४) उपलब्ध निधीनुसार पात्र लाभार्थ्यांना जिल्हा स्तरावर महामंडळाकडून कर्जाचे वितरण करण्यात आले आहे.

(५) व (६) शासन स्वयंरोजगाराच्या योजनेकरीता प्रतिवर्ष निधी उपलब्ध करुन देत असून महामंडळामार्फत राबवित असलेल्या योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याकरीता विविध प्रसिद्धी माध्यमांचा वापर करण्यात येतो, तसेच जिल्हा स्तरावर मेळाव्यांचे आयोजन करुन लाभार्थ्यांना योजनांची माहिती दिली जाते.

-----------------

## मुंबई, वरळी येथे समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत

**(४८) * १५७३८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळीच्या बी.डी.डी. चाळीत आर्थिक दुर्बल घटकांमधील सामाजिक न्याय विभागाच्यावतीने चालविल्या जाणाऱ्या तीन वसतिगृहामध्ये माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान पाणी नसल्याने शेकडो विद्यार्थी आणि विद्यार्थीनीना मोठया त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे स्वयंपाकगृहे, स्वच्छतागृहे, शौचालयामध्ये पाणी नसल्याने स्वच्छतेअभावी दुर्गंधीने भरलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतिगृहाच्या व्यवस्थापनाचे वारंवार दुर्लक्ष होत असल्याने विद्यार्थ्यांना सतत कोणत्या ना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) ते (३) नाही.

सदर तीनही वसतिगृहांमध्ये दि. ४ जुलै, २००३ व दि. २६ जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना सोई-सुविधा दिल्या जातात.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागातील केलेल्या बदल्यांबाबत

**(४९) * १४९४३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागात बदल्यांचा सावळागोंधळ सुरु असुन मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता दर्जाच्या बारा अधिका-यांची दोन ते सहा महिन्यात तीन ते पाच ठिकाणी बदली करण्यात आल्या असुन बदल्या करतांना कार्यकारी अभियंत्यांना उपलब्ध पदापेक्षा अधिक जागांवर पदोन्नती देण्यात आली आहे, या पदोन्नतीमुळे अनेक अधिका-यांना पदस्थापनेअभावी फुकट पोसावे लागत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये कार्यकारी अभियंता ते अधिक्षक अभियंता पदोन्नत्यांमध्ये कार्यकारी व अकार्यकारी पदाबाबत चुकीची माहिती देवून पात्र नसलेल्या अधिकाऱ्यांना पदोन्नती बहाल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये नियम व निकष डावलून एकाच वर्षात दोन- तीन बदल्या किंवा बदली आदेशात अंशतः बदल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बदल्यांसाठी तीन वर्षाचा नियम आहे मात्र हा नियम सर्रास धुडकावुन दर तीन महिन्याला अधिका-यांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात येत आहेत आणि या बदल्यांचा बोजा शासनावर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागातील काही अधिकाऱ्यांच्या एप्रिल किंवा मे महिन्याव्यतिरिक्त झालेल्या अनियमितकालिक बदल्या महाराष्ट्र शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४ (५) मधील तरतुदीनुसार प्रशासकीय कारणास्तव सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात आल्या आहेत.

तसेच पदोन्नतीने प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी पदस्थापना दिलेल्या काही अधिकाऱ्यांना रुजू करुन घेतले नव्हते. अशा अधिकाऱ्यांना अन्यत्र पदस्थापना देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) विभागातील काही अधिकाऱ्यांच्या एप्रिल किंवा मे महिन्याव्यतिरिक्त झालेल्या अनियमितकालिक बदल्या महाराष्ट्र शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार प्रशासकीय कारणास्तव सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्वयंसेवी संस्थेमार्फत अनुदान तत्वावर सुरु असलेल्या वृध्दाश्रमांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

**(५०) * १७९३१ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन १९६३ मध्ये ६० वर्ष वयावरील वृध्द, निराधार, निराश्रीत पुरुष स्त्रिया, अपंग यांचेसाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत अनुदान तत्वावर वृध्दाश्रमांना शासनाने मंजुरी प्रदान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आजमितीस अनुदान तत्वावर किती वृध्दाश्रम सुरु आहेत,

(३) या वृध्दाश्रमातील मान्य संख्या किती आहे वा त्या मान्य संख्येत संस्थेमार्फत किती वृध्दांना कोणत्या आधारावर मोफत प्रवेश देण्यात येतो,

(४) तसेच या मान्य संख्येच्या आधारावर वृध्दा श्रमांना प्रति व्यक्ती किती अनुदान मंजूर करण्यात येते व कोणकोणत्या सोयी-सुविधांसाठी दिल्या जातात,

(५) या वृध्दाश्रमांच्या सोयी-सुविधा वाढविण्यासाठी शासनाने अनुदानात वाढ करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) राज्यामध्ये ३९ वृद्धाश्रमांना अनुदानित तत्वावर मान्यता दिलेली आहे. त्यापैकी ३२ वृद्धाश्रम चालू असून ७ वृद्धाश्रम बंद आहेत.

(३) वृद्धाश्रमाची मान्य संख्या कमीत कमी २५ व जास्तीत जास्त १०० आहे. निराधार व निराश्रीत असलेल्या ६० वर्षावरील वृद्ध पुरूष आणि ५५ वर्षावरील वृद्ध स्त्रिया त्याचप्रमाणे अपंग वृद्धांना सदरहू आश्रमात मोफत प्रवेश देण्यात येतो.

(४) अनुदान तत्वावरील वृद्धाश्रमाना प्रति व्यक्ती रु.९००/- प्रमाणे अनुदान मंजुर करण्यात येते.यामधील वृद्धांना भोजन, कपडे, बेडींग साहित्य, औषधोपचार इत्यादी सोयी पुरविल्या जातात.

(५) व (६) या वृद्धाश्रमाच्या सोयी सुविधा वाढविण्याचा व अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

-----------------

## शिव सम्राट को.ऑप.सो.,विश्वकर्मा नगर, कळवा या गृहनिर्माण सोसायटीच्या मानीव अभिहस्तांतरणाबाबत

**(५१) * १५००२ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील सन १९९७ मध्ये स्थापित झालेल्या शिव सम्राट को.ऑप.सो., विश्वकर्मा नगर, कळवा नाका, कळवा या गृहनिर्माण सोसायटीसह अनेक गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मानीव अभिहस्तांतरासाठीचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे या कार्यालयाकडे २ वर्षापूर्वी सादर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोगवटा प्रमाणपत्र/बांधकाम पूर्णत्वाचा दाखला नसताना दिलेल्या मानीव अभिहस्तांतरणा संबंधित आदेश अंमलबजावणीच्या पुढील टप्प्यावर दप्तरी दाखल केले असल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांचेकडून दिनांक ५ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये चेअरमन/सेक्रेटरी, शिव सम्राट को.ऑप.सो., विश्वकर्मा नगर, कळवा नाका, कळवा या गृहनिर्माण सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांसह अन्य गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना दिनांक ५ जून, २०१५ रोजी व त्यानंतरही पत्रान्वये कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे, कळवा या भागामध्ये अधिकाधिक इमारती या सन १९७५ पासूनच्या कालावधीतील असल्याने त्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र/बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळणे दुरापास्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या गृहनिर्माण सोसायट्यांकडे भोगवटा प्रमाणपत्र/बांधकाम पूर्णत्वाचे दाखले नाहीत, अशा इमारतींबाबत मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

बऱ्याच जुन्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे इमारतीचे भोगवटा दाखले इ.संस्था पदाधिकाऱ्यांना उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे मानीव अभिहस्तांतरणासाठी प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करण्यासाठी सहकार

आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे या कार्यालयाने दिनांक २३.०७.२०१५ रोजीचे आदेशान्वये विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची समिती गठीत केली असून, सदर समितीचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोंद्री ते सत्रापूर (ता.रामटेक, जि.नागपूर) या मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५२) * १८११३ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोंद्री ते सत्रापूर (ता.रामटेक, जि.नागपूर) या मार्गाच्या दुरुस्ती करण्याकरिता सन २०१५-१६ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात या कामाचा समावेश करण्यात आला, परंतू उक्त कामाला सुरुवात करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सत्रापूर उपसिंचन योजनेच्या उपकालव्याचे काम व पेंच प्रकल्प खिंडसी पूरक कालवा बांधकामामुळे उक्त रस्ता खराब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नांकित रस्त्याचे काम सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट नाही.

(२) सत्रापूर उपसिंचन उपकालव्याचे काम व पेंच प्रकल्प खिंडसी पूरक कालवा बांधकामामुळे रस्त्याच्या वाहतूकीत वाढ झाली असल्यामुळे रस्ता क्षतिग्रस्त होत आहे.

(३) व (४) प्रश्नाधीन रस्त्याचे काम मंजूरी व निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

## राज्यातील औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या अमरावती विभागात उद्योगांना प्रोत्साहन व सवलती देण्याबाबत

**(५३) * १८४०४ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या अमरावती विभागात सुमारे ५ हजार कोटी रुपये गुंतवणूकीच्या उद्योगांचे प्रस्ताव अद्याप कागदावरच असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात उद्योगांना प्रोत्साहन व सवलती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२) सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत अमरावती विभागामध्ये एकूण २४ विशाल प्रकल्पांना मान्यता दिली असून त्यात आश्वासित गुंतवणूक रु.१४५७६ कोटी प्रस्तावित असून २२१५८ व्यक्तींना रोजगाराच्या संधी प्रस्तावित आहेत.

तसेच "मेक इन इंडिया" या कार्यक्रमामध्ये अमरावती विभागातील प्रस्तावित सूक्ष्म, लघु, मध्यम व मोठे उद्योगांतर्गत एकूण २३५ उद्योजकांनी शासनासमवेत सामंजस्य करार केले असून त्यामधील प्रस्तावित भांडवली गुंतवणूक रु.२८६० कोटी व ८१८६ व्यक्तींना रोजगाराच्या संधी प्रस्तावित आहेत.

या विभागातील ५ विशाल प्रकल्पांना व ३ मोठ्या प्रकल्पांना पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले असून त्यांना प्रोत्साहनेही देण्यात आली आहेत.

तसेच एम आय डी सी ने या विभागात एकूण ४३ औद्योगिक क्षेत्रे स्थापन केली असून त्यासाठी एकूण ६३९९.१२ हे.आर. जमीन संपादीत करण्यात आली आहे. या विभागात महामंडळाने ५९८८ भुखंडापैकी ५३१८ भूखंडांचे वाटप केले आहे. सद्य:स्थितीत १५८२ भूखंडांवरील उद्योगांमध्ये उत्पादन सुरू असून त्यातून ३४,२४९ व्यक्तींना रोजगार निर्माण झाला आहे.

नांदगाव पेठ, अमरावती येथे वस्त्रोद्योग पार्क स्थापन केला असून सदर ठिकाणी मे.रेमंड टेक्सटाईल्स यांचेकडून अतिविशाल वस्त्रोद्योग प्रकल्प स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच शासनाने विदर्भातील नागपूर व अमरावती विभागातील विशाल व अतिविशाल प्रकल्पांना १००% ढोबळ मुल्यवर्धीत करावर आधारित प्रोत्साहने देण्याचा नुकताच निर्णय घेतला असून त्यामुळे सदर भागात अधिक गुंतवणुक होवून औद्योगिकरणास चालना मिळणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बांधपाडा (ता. उरण) येथील अमेया लॉजिस्टीक कंपनीच्या केमिकलयुक्त दुषित सांडपाण्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक झाल्याबाबत**

**(५४) * १६५१६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील अमेया लॉजिस्टीक कंपनीने मातीचा भराव केल्याने तसेच केमिकलयुक्त सांडपाणी निचरा होण्याच्यादृष्टीने योग्य नियोजन न केल्याने मौजे बांधपाडा, खोपटे, धसाखोशी येथील जमिनीत पाणी शिरल्याने केमिकलयुक्त दुषित सांडपाण्यामुळे भातपीकाखालील जमिनी नापीक झाल्याची तक्रार आपदग्रस्तांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमेया लॉजिस्टीक कंपनी प्रशासनाने शेतीचे होणारे नुकसान थांबविण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, कंपनी प्रशासनाकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, याबाबतची तक्रार तहसिलदार उरण यांचेकडे प्राप्त झाली आहे.

(२) व (३) प्रस्तुत तक्रारीबाबत तहसिलदार उरण यांचेकडून चौकशी करण्यात आली असून त्यांच्या दिनांक ३०/०९/२०१५ च्या पत्रान्वये संबंधितांना नुकसान भरपाई देण्याबाबत कंपनी प्रशासनाला सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माथार्जून (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील आश्रमशाळेतील पाचवीचा वर्ग बंद केल्याबाबत**

**(५५) * १५८३३ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथार्जून (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील आश्रमशाळेत गेली ३५ वर्षे चालू असलेला पाचवीचा वर्ग आश्रमशाळा व्यवस्थापन व मुख्याध्यापकांच्या बेजबाबदारपणामुळे या शैक्षणिक वर्षात बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील आदिवासी बांधवाने तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी पांढरकवडा (जि.यवतमाळ) आदिवासी विकास प्रकल्प अधिकाऱ्यांचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लक्ष वेधले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी साठी विद्यार्थी मिळाले नसल्याने माथार्जून (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील आश्रमशाळेत या शैक्षणिक वर्षात ५ वी चा वर्ग सुरू करता आलेला नाही.

(२) हे खरे नाही.

माथार्जुन शाळेच्या परिसरातील आदिवासी बांधवांनी किंवा लोक प्रतिनिधींनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा जि.यवतमाळ किंवा अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती यांचे कार्यालयास कोणत्याही प्रकारचे निवेदन सादर केलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भटक्या विमुक्त जमातीचे प्रमाणपत्र देतांना ६० वर्षाचा कागदोपत्री पुरावा मागितल्याबाबत

**(५६) * १४६३१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भटक्या व विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे, वंशावळीची नोंदच नसल्याने बहुतांश विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे मिळणे अवघड झाले आहे. शासनाने भटक्या विमुक्त जमातीचे प्रमाणपत्र देतांना ६० वर्षाचा कागदोपत्री पुरावा मागितला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावात घर नाही आणि शिवारात शेत नाही अशी या समाजाची आजवरची अवस्था आहे व कुटुंबाची नोंद कोठे व कशी असणार असा प्रश्न निर्माण झाला आहे तेव्हा ही जाचक अट शासन रद्द करून भटक्या विमुक्तांना न्याय देणार आहे काय,

(३) असल्यास, या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या विभागाच्या दि.६/२/२०१० च्या शासन निर्णयान्वये विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना दि.२१/११/१९६१ रोजी वा तत्पूर्वी त्यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली असून त्यानुसार जातपडताळणी नियम - २०१२ मध्ये सदर अटीचा समावेश करण्यात आला आहे. जातपडताळणी नियम-२०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही.

(२) व (३) विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील व्यक्ती हया उदरनिर्वाहाकरिता भटकंती करत असल्याने त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी सोयीचे व्हावे याकरिता ते ज्या ठिकाणी वास्तव्य करीत असतील त्या गावच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाने दिलेले प्रमाणपत्र एक पुरावा म्हणून ग्राहय धरण्याबाबतच्या सूचना दि.१/१०/२००८ च्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या असून यानुसार कार्यवाही करण्याबाबत पुन्हा दि.२२/९/२०१५ च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खामगांव (जि.बुलढाणा) येथील म.रा.औ.वि. महामंडळ क्षेत्रात नवीन अग्निशामक दलाची स्थापना करण्याबाबत

**(५७) * १६६०८ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२५७७ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील म.रा.औ.वि. महामंडळ क्षेत्रात नवीन अग्निशामक दलाची स्थापना करण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान खामगाव येथील मे.गुप्ता ऑईल इंडस्ट्रीजला आग लागल्यामुळे खामगाव, शेगाव, मलकापूर, जळगाव, जामोद, बुलडाणा, अकोला या ठिकाणावरून अग्निशामक दलाच्या १५० ते २०० गाड्या मागवाव्या लागल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खामगाव म. रा. औ. वि. महामंडळाच्या क्षेत्रात नवीन अग्निशामक दलाची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही. या औद्योगिक वसाहतीमध्ये अग्निशमन केंद्र उभारण्याबाबत कोणतीही विनंती उद्योजकांकडून महामंडळास प्राप्त झालेली नाही.

(२) मुख्याधिकारी नगरपरिषद खामगांव, यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार माहे ०१/०५/२०१५ रोजी मध्यरात्री सुमारे २ वाजता खामगांव औद्योगिक क्षेत्रातील मे.गुप्ता ऑईल इंडस्ट्रीजला मोठ्या प्रमाणात आग लागली. या आगीच्या वर्दीवर खामगांव नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाची ३ अग्निशमन वाहने व मलकापूर, जळगांव, बुलढाणा, अकोला, नांदुरा, शेगाव या नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागांची प्रत्येकी १ अग्निशमन वाहन अशी ९ अग्निशमन वाहने वर्दीवर उपस्थित होती व या ९ अग्निशमन वाहनांनी पाण्यासाठी एकूण १६५ फेऱ्या मारल्या होत्या व त्यासाठी महामंडळाने पाणी पुरवठा योजनेंतर्गत असलेल्या आरक्षणातून पाणी उपलब्ध करुन दिले होते.

(३) याबाबतची कोणतीही विनंती / प्रस्ताव शासनास अथवा महामंडळास प्राप्त न झाल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यात तयार होणाऱ्या कापड प्रोसेसिंग करिता मालेगांव तालुक्यात उद्योग सुरु करण्याबाबत**

**(५८) * १७०९९ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यात तयार होणाऱ्या कापड तालुक्यात प्रोसेसिंग मालेगांव करिता उद्योग सुरु करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वस्त्रोद्योग मंत्री यांना दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त होण्यापूर्वीच केंद्र शासनाने सुक्ष्म व लघु उपक्रम समूह विकास योजने अंतर्गत (MSE-CDP) या योजने अंतर्गत सामायिक सुविधा केंद्र (कॉमन फॅसिलीटी सेंटर CFC) टेक्सटाईल क्लस्टर मालेगाव जि.नाशिक या प्रकल्पास रु.१५८४.४७ लाख इतक्या प्रकल्प किंमतीस तसेच विशेष हेतू वाहन (SPV) म्हणून मे.बळीराम हिरे हाय-टेक टेक्सटाईल क्लस्टर सर्व्हीसेस प्रा.लि.मालेगाव यांना नियुक्त करण्यास मंजूरी दिली आहे. सदर सामायिक सुविधामध्ये (CFC) प्रोसेसिंगच्या सेक्शनल वार्पिंग यार्न, डायरेक्ट वार्पिंग, ऑटो सायझिंग, ब्लिचिंग रेंज, मर्सरायझिंग आणि स्ट्रेंटनिंग फॅसिलीटी व तपासणीकरीता प्रयोगशाळा यांचा समावेश आहे. सदर प्रकल्पास राज्य शासनाच्या सहभागाचे अनुदान उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामार्फत रु. ६०.०० लाख (प्रथम टप्पा) दिनांक २९/३/२०१४ रोजी व रु. ६०.०० लाख (दुसरा टप्पा) दिनांक २७/११/२०१४ रोजी तसेच मा.लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाल्यानंतर रु. ३०.०० लाख (तिसरा व अंतिम टप्पा) दिनांक २४/११/२०१५ रोजी मंजूर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-------------------

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५९) * १७१६४ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सुमारे २७८ कोटी रूपयांचा गैरव्यवहार झालेला असून यासंदर्भात उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाबार्ड मार्फत बँकेचा करण्यात आलेल्या तपासणीचा अहवाल दि. २२.१२.२०१५ रोजी प्राप्त झाला असून अहवालात नमूद केलेले मुद्दे, बँकेच्या कलम ८९अे तपासणीत आढळून आलेले मुद्दे, बँकेचे चाचणी लेखापरीक्षणात नमूद

केलेले शेरे, बँकेने वेळोवेळी यासंबधाने सादर केलेले खुलासे तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या यासंबंधी सूचनांचा सारासार विचार करुन बँकेविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यातील पद्मशाली समाजाला जातीच्या दाखल्यासाठी येत असणारी अडचण**

**(६०) * १७२३० श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पद्मशाली समाज आंध्रप्रदेशातून विस्थापीत होऊन राज्यात स्थायिक झाला आहे त्यामुळे त्यांना जातीच्या दाखल्यासाठी १९६० च्या पुर्वीच्या जातीचा उल्लेख असलेली कागदपत्रे शासनास सादर करणे अशक्य होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १६ मार्च, २०१३ नुसार वेतन व शेतीपासून मिळणारे उत्पन्न वगळून इतर मार्गाने होणारे उत्पन्न रुपये ६ लाख मर्यादेत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र मिळत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

राज्याच्या मागासवर्गीयांच्या यादीतील “विशेष मागास प्रवर्ग” या प्रवर्गामध्ये अ.क्र. ३(९) वर “पद्मशाली” या जातीची नोंद आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या विभागाच्या दि.६/२/२०१० च्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना दि.१३ ऑक्टोबर, १९६७ रोजी वा तत्पूर्वी त्यांचा राज्यातील रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली असून त्यानुसार जातपडताळणी नियम-२०१२ मध्ये सदर अटीचा समावेश करण्यात आला आहे. जातपडताळणी नियम-२०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्‌भवत नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

या विभागाच्या दि. २५/३/२०१३ च्या परिपत्रकान्वये ज्या व्यक्तींचे वेतनापासून व शेत जमिनीपासून मिळणारे उत्पन्न वगळून इतर मार्गाने होणारे उत्पन्न हे रु. ६ लाख प्रती वर्ष या पेक्षा जास्त नसेल तर अशा व्यक्तींची मुले/मुली उन्नत व प्रगत गटामध्ये (क्रिमिलेअर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरतील.

तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, तसेच सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ नुसार जातपडताळणी नियम २०१२ विहित करण्यात आले आहेत. या नियमांनुसार जातप्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे कामकाज चालते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईच्या एम.इ.पी.इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे टोल नाक्यांचे कंत्राट रद्द करण्याबाबत**

**(६१) * १७२६६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ११२४७ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पाच प्रवेशद्वारावरील एम.इ.पी.इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला तब्बत ११७६ कोटी रूपये प्राप्त झाले असून टोल आणि वाहनांच्या संख्येत दरवर्षी होणारी वाढ लक्षात घेता, १६ वर्षाच्या टोलवसुलीच्या ठेक्यास कंपनीस तिप्पट नफा होणार नाही, या विषयीच्या विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३१३६३ च्या उत्तराच्या वेळी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांनी दिलेल्या उत्तरात माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंत रुपये १३६२.५९ कोटी इतकी रक्कम जमा झाल्याचे नमूद केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच प्रवेशद्वारावरील टोलमधुन पुढील वर्षात प्रकल्पाची मुळ किंमत खर्च २१०० कोटी रूपये वसुल होणार असल्याने सन २०१६ पर्यंत कंत्राटाची वाढवुन दिलेली मुदत रद्द करण्याविषयी कोणत्याही प्रकारचा उल्लेख उत्तरामध्ये करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाच टोल नाक्यांवर दिनांक ३ सप्टेंबर, २०२७ पर्यंत टोलवसुली चालु ठेवण्याचे कंत्राट रद्द करण्याची कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात नेमलेल्या अतिरिक्त मुख्य सचिव, सा.बा.विभाग यांचे समितीच्या अहवालनुसार काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) अतिरिक्त मुख्य सचिव, सा.बां.विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल अद्याप सादर झालेला नाही.

-----------------

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दक्षिण मुंबईतील इलाका (प्रेसिडेन्सी) विभागातील कामांच्या बनावट देयकांबाबत**

**(६२) * १७६२९ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दक्षिण मुंबईतील इलाका (प्रेसिडेन्सी) विभागातील सन २००९ ते २०१३ या काळातील झालेल्या कामांची थकीत बिले देण्याकरीता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशी व तपासामध्ये सदर बिले बनावट केलेल्या कामांची असून, कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या संगनमताने ती तयार करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व प्रकरणाची श्री.उल्हास डेबडवार, मुख्य अभियंता, मुंबई विभाग यांनी चौकशी पूर्ण केली आहे काय,

(३) असल्यास, तांत्रिक मान्यता, जॉब कॅटेगरी, जॉब क्रमांक, ॲग्रीमेन्ट क्रमांक, टेंडर प्रक्रिया, मोजमाप पुस्तकातील नोंदणी हे सर्व सोपस्कार पार पडणारे कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता यांचेविरोधात खोटी व बनावट बिले तयार केल्याबद्दल कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई-अहमदाबाद महामार्गावर दरड कोसळून वाहनांचे होत असलेले अपघात**

**(६३) * १७९९५ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वसई, भालीवली, ढेकाळे, हलोली, दुर्वेस, चारोटी, तवा, महालक्ष्मी या भागात महामार्गावर दरड कोसळून वाहनांचे मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गाची देखभाल दुरुस्ती करणाऱ्या ठेकेदार कंपनीच्या बेजबाबदारीमुळे तसेच प्राधिकरणामुळे वाहनांचे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून सदर बेजबाबदार ठेकेदार कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ च्या सहापदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत सुरु असून अशा प्रकारच्या कुठल्याही अपघाताची नोंद नसल्याचा अहवाल व्यवस्थापक (तांत्रिक), भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, मनोर यांनी कळविले आहे. तसेच वसई, भालीवली, ढेकाळे, हलोली, दुर्वेस, चारोटी, तवा, महालक्ष्मी या भागात महामार्गावर दरड कोसळून अपघात घडल्याच्या घटना घडलेल्या नसल्याचे पोलीस अधिक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## युवा जागृती सहकारी पतसंस्था, उमरेड (जि.नागपूर) येथील संचालक मंडळावरील सदस्यांच्या नियुक्तीबाबत

**(६४) * १८१५२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युवा जागृती सहकारी पतसंस्था, उमरेड (जि.नागपूर) येथे ज्या सदस्यांकडे कर्जाची थकबाकी प्रलंबित आहे त्याच सदस्यांची संचालक मंडळावर नियुक्ती करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थेची आमसभा ही सभासदाची गणपुर्ती नसताना देखील सभेमध्ये अनेक बनावट ठराव मंजूर करुन संचालक मंडळातील सदस्य व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे मोठ्या प्रमाणात कर्ज मंजूर करुन घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थेच्या काही सदस्यांनी संस्थेने आयोजित केलेल्या सभेची व संस्थेच्या कारभाराची माहिती मागितली असता संस्था माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यासाठी संस्थेच्या काही सदस्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री, सहायक निबंधक उमरेड, जिल्हा उपनिबंधक नागपूर यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संस्थेची चौकशी करुन संचालक मंडळावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर कार्यालयाकडे दिनांक १९.१०.२९१५ व दिनांक ०३.१२.२०१५ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) आमसभेतील कार्यवाहीबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) संस्था माहिती देण्यास टाळाटाळ करित असल्याबाबत संस्थेच्या दोन सभासदांनी दिनांक ०३.१२.२०१५ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर या कार्यालयास कळविले आहे.

(४) व (५) निवडणुक निर्णय अधिकारी यांनी दिनांक ०१.०६.२०१५ ते दिनांक ३०.६.२०१५ या कालावधीत पतसंस्थेची रीतसर निवडणुक प्रक्रीया पुर्ण करुन महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम, २०१४ मधील नमुना ई-९ मध्ये अविरोध निवडणुकीचा निकाल जाहीर केला आहे. निवडणुक दरम्यान उमेदवारांच्या नामनिर्देशनावर कोणीही आक्षेप घेतला नाही. आमसभेच्या वैधतेबाबत. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ९१ नुसार न्यायालयात दाद मागण्याची तरतुद आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दाताडा ते आजेगाव (ता.सेनगाव, जि.हिंगोली) या रस्त्याचे दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(६५) * १८४२१ श्री.सुभाष झांबड, श्री.जर्नादन चांदूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाताडा ते आजेगाव (ता.सेनगाव, जि.हिंगोली) या तीन किमी रस्त्याचे आजेगाव जवळील दिड किमी रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करण्यात आले, उर्वरित रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम दिड वर्षापासून रखडल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) विषयाधीन रस्त्याच्या लांबीपैकी १.३०० कि.मी. लांबीत रस्ता सुधारण्याचे काम सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पात मंजूर आहे. या कामाची किंमत रुपये ६० लक्ष इतकी आहे. कामासाठी निविदा बोलवण्यात आल्या आहेत.

-----------------

## सामाजिक न्याय विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहातील कर्मचाऱ्यांची पदे मंजुर करण्याबाबत

**(६६) * १६३०० डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत संचलित अनुदानित वसतिगृहांसाठी शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २००५ अन्वये ४८ मान्य विद्यार्थी संख्येपर्यंत १ अधीक्षक, १ स्वयंपाकी व १ पहारेकरी अशी ३ पदे मंजुर करण्यात आलेली असून त्यापुढील ३१४ विद्यार्थी संख्येपर्यंत फक्त १ अतिरिक्त स्वयंपाकी व १ मदतनीस पदे मंजुर करण्यात येतात, त्यामुळे स्वयंपाक वेळेवर न होणे व कामाच्या अन्य नियोजनात अडचणी उद्भवत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीनशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे स्वयंपाकासाठी फक्त २ स्वयंपाकी पदे अपुरी ठरत असल्याने विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची पदे मंजुर करणे आवश्यक असल्याचेही शासनाच्या निदर्शनास आले आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांच्या सोय-सुविधेच्या दृष्टीकोणातून प्रचलित शासन निर्णयात आवश्यक वाढीव कर्मचाऱ्यांची पदे मंजुर करणेसंबंधीची सुधारित तरतुद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही. तथापि, शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २००५ मधील तरतुदीनुसार अनुदानित वसतिगृहास ४८ विद्यार्थी मान्य संख्येपर्यंत १ अधिक्षक, १ स्वयंपाकी व १ पहारेकरी अशी ३ पदे मंजुर करण्यात आलेली आहे. तसेच, ४८ विद्यार्थी संख्येच्या पुढे १ अतिरिक्त स्वयंपाकी व १ मदतनीस अशी पदे मंजुर करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेर्डा (ता.पाथरी, जि.परभणी) येथील सहकारी सोसायटीमध्ये कर्ज वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(६७) * १६६८२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेर्डा (ता.पाथरी, जि.परभणी) येथील सहकारी सोसायटीने डीमांड कर्ज वाटपात शुभमंगल विवाह योजनेत बनावट कागदपत्र व दस्ताऐवजांचा वापर करून बँकेची व शासनाची लाखो रूपयांची फसवणुक केल्यावरून सोसायटीचे चेअरमन, सदस्य, बोगस लाभार्थी, शाखा तपासणीस, शाखा व्यवस्थापक व इतर यंत्रणेची चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे नोंदवावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहकार आयुक्त, पुणे व प्रधान सचिव, सहकार, मुंबई यांच्याकडे सन २०१६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट सातबाराचा वापर करून उचलण्यात आलेले कर्ज तसेच शुभमंगल योजनेसाठी करण्यात आलेल्या गैरप्रकारातील कागदपत्रांची व दस्ताऐवजांची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, वरील गैरप्रकार करणाऱ्या दोषी चेअरमन, सचिव, सदस्य, बोगस लाभार्थी, शाखा व्यवस्थापक व शाखा तपासणीस यांच्यावर गुन्हे नोंदवून सदरील रक्कम वसुल करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) चौकशीसाठी श्री. आर. ए. सरसमकर, विशेष लेखा परिक्षक, सहकारी संस्था, (वर्ग -२) (फिरते पथक) परभणी यांना दि. २४/०२/२०१६ रोजी दिलेले आहे.

(३) चौकशी चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**शेतकऱ्यांना बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून पीक विम्याचे वाटप न झाल्याबाबत**

**(६८) * १६०९७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८२६ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादीत, या बँकेला दिनांक ११ जून २०१५ रोजी रुपये २५१ कोटी पीक विमा वाटपासाठी रक्कम प्राप्त असताना त्यांनी विहीत मुदतीत रक्कमेचे वाटप शेतकऱ्यांना केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिवाळी अधिवेशन २०१५ च्या कालावधीत मा.सभापती महाराष्ट्र विधान परिषद यांच्या अध्यक्षतेखाली याबाबत बैठक होऊन पीक विमा आणि खरीप अनुदान २०१४ च्या वाटपाबाबत बँकेचे चाचणी लेखापरिक्षण करण्याचे निर्देश संबंधितास देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्हा बँकेचे चाचणी लेखापरिक्षण करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, लेखापरिक्षण अहवालातील निष्कर्ष काय आहेत व दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) खरीप हंगाम २०१४ मध्ये ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा भरणा केला होता, अशा शेतकऱ्यांना भारतीय कृषी विमा कंपनीकडून बँकेस दिनांक ११.०६.२०१५ रोजी रुपये २५१ कोटी आरटीजीएस द्वारे प्राप्त झाले होते.सदरची रक्कम बँकेने मुदतीमध्ये वितरीत केली आहे.

(२) सदर प्रकरणी मा. सभापती, विधान परिषद यांनी सहकार विभागाच्या सेवानिवृत्त अधिका-यामार्फत चौकशी करण्यात यावी अथवा औरंगाबाद विभागाच्या बाहेर कार्यरत असलेल्या तीन अधिका-यांच्या समिती मार्फत चौकशी करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) लागू नाही.

-----------------

## ठाणे जिल्हा सहकारी संस्था उपनिंबधक विभागाच्या डोंबिवली विभागीय कार्यालयाच्या परिक्षेत्रातील हाऊसिंग संस्था बंद असल्याबाबत

**(६९) * १८४५७ श्री.जर्नादन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा सहकारी संस्था उपनिंबधक विभागाच्या डोंबिवली विभागीय कार्यालयाच्या परिक्षेत्रातील सुमारे २६० हाऊसिंग संस्था बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. अंशत: खरे आहे. उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली या कार्यालयाच्या परिक्षेत्रातील सुमारे २६६ हौसिंग संस्था बंद / कार्यस्थगित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये उघडकीस आले आहे.

(२) सर्वेक्षणा दरम्यान बंद कार्यस्थगित इ. आढळून आलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २१ अन्वये नोंदणी रद्द करण्याबाबत दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रात जाहीर नोटीस देण्यात आलेली असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील उड्डाण पुलाखालच्या पार्किगबाबत

**(७०) * १६३६० श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उड्डाण पुलाखालील पार्किगला मा.उच्च न्यायालयाचा विरोध असताना काही उड्डाण पुलाच्या खाली पार्किंग होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशंत: खरे आहे.

मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २७.०६.२००८ रोजी झालेल्या बैठकीत उड्डाणपुलाखालील पार्किंगमुळे घातपाताची शक्यता लक्षात घेऊन सुरक्षिततेच्या दृष्टीने उड्डाणपुलाखालील पार्किंग बंद करून उद्योजकामार्फत सुशोभिकरण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिनांक २५.०७.२०११ रोजी ९ मुदत संपलेले पे-ॲण्ड पार्कचे ठेके बंद करण्याचा निर्णय घेतला. उर्वरीत १२ वाहनतळाच्या कंत्राटदारांना मुदत संपवावयाच्या वात वाहनतळ बंद करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या. सदर कामांची मुदत संपण्यापूर्वी ८ याचिका मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २० जून, २०१३ रोजी उड्डाणपुलाखालील पार्किंग बंद करण्याबाबत निर्णय देऊन ६ याचिका खारीज करून उर्वरीत २ याचिका अनुक्रमे दिनांक १२.०७.२०१३ व ०७.०४.२०१४ रोजी खारीज करून पार्किंग बंद करण्याचे आदेश दिले. तथापि, मुंबई महानगरपालिकेच्या एका उड्डाणपुलाखाली वाहनतळ सुरु आहे. सदरहू प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

(२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने पे ॲण्ड पार्क योजना राबविलेल्या २१ पैकी १६ उड्डाणपुलाखालील पार्किंग बंद करण्यात आली असून एलफीस्टन उड्डाणपुलाखाली अंशत: अनधिकृत पार्किंग असून उड्डाणपुलाखालील मोकळ्या जागेमध्ये मे.स्टोअर वन रिटेल इंडिया कंपनीकडून सुशोभिकरणाचे काम प्रगतीत आहे. उर्वरीत ४ उड्डाणपुलापैकी कुर्ला सीएसटी उड्डाणपुलासंदर्भात FIR दाखल केला असून उर्वरीत ठिकाणी स्थानिक पोलीसांच्या मदतीने अनधिकृत वाहनतळ हटविण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सुकेवाडी (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील कार्पोरेशन बँकेच्या व्यवस्थापकाने बनावट कृषी कर्ज दाखवून केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(७१) * १६७६५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकेवाडी (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील एका शेतकऱ्याच्या नावे खोटी कागदपत्रे बनवून कार्पोरेशन बँकेच्या व्यवस्थापकाने बनावट कृषी कर्ज दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असून यासंदर्भात शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सदर बँकेच्या व्यवस्थापकावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अशंत: खरे आहे.

श्री. भाऊसाहेब तात्याबा कुटे, शेतकरी सुकेवाडी, ता. संगमनेर, जि.अ.नगर, यांच्या नांवावर दि. २२/११/२०११ रोजी सीसीसीके/०१/११००४४ या क्रमांकावर पिक कर्जै घेतल्याची नोंद आहे. तथापि, श्री. कुटे यांनी सदरहू कर्ज आपण घेतले नसून या कर्ज प्रकरणाशी त्यांचा काहीही संबंध नसल्याचे नमूद केले आहे. सबब, सदर प्रकरणी कार्पोरेशन बँकेच्या प्रधान कार्यालय, मंगलोर येथील विजीलन्स डिपार्टमेंट, फ्रॉड मॉनीटरींग सेल येथे पुढील कारवाईसाठी अहवाल शाखा व्यवस्थापक, कार्पोरेशन बँक शाखा संगमनेर यांनी सादर केलेला आहे.

(२) सदर प्रकरणाचा अहवाल कार्पोरेशन बँकेच्या प्रधान कार्यालय, मंगलोर येथील विजीलन्स डिपार्टमेंट, फ्रॉड मॉनीटरींग सेल येथे पुढील कारवाईसाठी सादर केला असून सद्यस्थितीत त्यावर पुढील चौकशी चालू आहे.

(३) सद्यस्थितीत वरील प्रमाणे चौकशी चालू आहे.

-----------------

**महाराष्ट्र राज्य संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाच्या कर्ज वाटपाबाबत**

**(७२) * १५२३७ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाव्दारे महाराष्ट्र राज्य संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाची समाजाच्या आर्थिक विकासाकरिता स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात ह्याकरिता किती नागरिकांनी अर्ज केले आहेत,
(३) महामंडळ व बँके मार्फेत किती लाभार्थ्यांना किती रकमेचे कर्ज वाटप झाले आहे व कर्मचारी वर्गाची वेतनाची रक्कम किती आहे,
(४) कर्जवाटप केले नसल्यास गेल्या अनेक महिन्यांपासून कर्ज वाटप न करण्याची कारणे कोणती आहेत,
(५) शासन विविध कार्यात अमाप पैसे खर्च करत असतांना स्वंयरोजगाराकरिता निधी उपलब्ध न करण्याची कारणे कोणती आहेत,
(६) शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) महामंडळाच्या विविध कर्ज पुरवठा योजनांसाठी सन २०१४-२०१५ मध्ये एकुण १६६३ अर्जदारांनी व २०१५-२०१६ मध्ये एकुण १८७१ अर्जदारांनी अर्ज सादर केले आहेत.
(३) (अ) सन २०१४-२०१५ मध्ये विविध योजनांअंतर्गत कर्ज वितरणाचा तपशिल खालील प्रमाणे आहे. (रु.लक्ष)

| लाभार्थी | अनुदान | बीज कर्ज | एन.एस.एफ.डी.सी.कर्ज |
|---|---|---|---|
| १८९५ | १८९.३८ | २५५.९६ | ७९४.९४ |

(ब) सन २०१५-२०१६ मध्ये (जाने, २०१६ अखेर पर्यंत) विविध योजनांअंतर्गत कर्ज वितरणाचा तपशिल खालीलप्रमाणं आहे. (रु.लक्ष)

| लाभार्थी | अनुदान | बीज कर्ज | एन.एस.एफ.डी.सी.कर्ज |
|---|---|---|---|
| ११७५ | १४०.६९ | २१२.२५ | ७४५.४६ |

(क) कर्मचारी वेतनाची सन २०१४-२०१५ मधील रक्कम रु.१०५१.४९ लक्ष व सन २०१५-२०१६ मधील (जाने, २०१६ अखेर पर्यंत) रक्कम रु.३३९.६८ लक्ष इतकी आहे.

(४) महामंडळाकडे सर्व योजनांकरीता उपलब्ध असलेल्या निधीनुसार क्रमाने लाभार्थ्यांना कर्जाचे वाटप महामंडळाकडून केले जाते.
(५) व (६) महामंडळामार्फत लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्यात येत असुन, सदर प्रशिक्षणावर सन २०१४-२०१५ मध्ये रु.१०.१३ लक्ष व २०१५-२०१६ मध्ये रु.३१.१९ लाक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

-----------------

**कोपरी (जि.ठाणे) शासकीय वसतिगृहाची दुरुस्ती करणेबाबत**

**(७३) * १५७६०  श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील कोपरी कॉलनी भागात असलेल्या शासकीय वसतिगृहाच्या छताचा एक भाग कोसळून इयत्ता १२ वीत शिकणारी मुलगी जखमी झाल्याची घटना दिनांक ६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेत जखमी झालेल्या मुलीस औषधोपचार करणेबाबत व सदर वसतिगृहाची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) ठाणे शहरातील कोपरी कॉलनी भागात असलेल्या आदिवासी मुलींच्या शासकीय वस्तीगृहातील छताचा एक भाग दिनांक ०६.१०.२०१५ रोजी कोसळल्याने कु.भावना भुसारा ही विद्यार्थीनी जखमी झाली होती, हे खरे आहे.
(२) सदर विद्यार्थीनीस जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे येथील दवाखान्यात तात्काळ दाखल करण्यात आलेले होते. तिच्यावर उपचार करुन तिला डिस्चार्ज देण्यात आला.

कोपरी, जि.ठाणे येथील वसतिगृहाची इमारत दुरुस्त करण्याबाबत जिल्हा मार्केटिंग फेडरेशन, ठाणे यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि, सदर इमारत नादुरुस्त असून स्थलांतरीत करणे आवश्यक आहे.

सदर वसतिगृहाकरिता ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक १६ मधील ८ वर्गखोल्या व हॉलचा ताबा भाडेनिश्चिती झाल्यावर विभागास मिळणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशनच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(७४) * १६४३२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशनच्या विविध ११ प्रलंबित मागण्यांवर कार्यवाही करण्यासाठी संघटनेने दिनांक ९ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय यांना निवेदन देवूनही त्यांच्याकडून माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपंग बांधवांना पुणे-मुंबई चकरा माराव्या लागत असल्यामुळे पुणे येथील अपंग आयुक्तालयाचे कार्यालय मुंबईला मंत्रालयाजवळ स्थलांतरीत करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशनच्या विविध मागण्यांपैकी मुकबधीर विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १२ वी पर्यंत सांकेतीक भाषेमध्ये शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक ४.८.२०१५ रोजी संघटनेच्या प्रतिनिधींसोबत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी बैठक घेतलेली आहे. तसेच आयुक्त, अपंग कल्याण यांना असलेल्या अर्ध न्यायिक अधिकारानुसार संघटनेच्या इतर तीन मागण्यांच्या अनुषंगाने सुनावणी घेण्यात येऊन त्याबाबतची निर्णयप्रक्रिया सुरू आहे.

राज्यस्तरीय कर्ण बधीर असोसिएशनच्या सदर निवेदनातील इतर मागण्या या विविध प्रशासकीय विभागांशी संबंधित असल्याने आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १८.०६.२०१५ च्या पत्रान्वये शासनाकडे पाठविलेले होते. सदर निवेदन पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सर्व संबंधित विभागांना पाठविण्यात आलेले आहे. या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याबाबत दिनांक २९.०२.२०१६ च्या स्मरण पत्रान्वये सर्व संबंधितांना पुनश्च कळविण्यात आले आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर मागणीच्या अनुषंगाने आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचेकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आलेला आहे. सदर अहवाल प्राप्त होताच पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राजुरा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील शासकीय, अर्धशासकीय सेवक या पथसंस्थेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(७५) * १७९६६ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय, अर्धशासकीय सेवकांची पतसंस्था राजुरा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) या संस्थेत झालेल्या करोडो रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, चंद्रपूर ग्रामीण या संघटनेच्यावतीने दिनांक ३० ऑगस्ट, २०१२ रोजी वा त्यासुमारास चंद्रपूर जिल्हा उपनिबंधकांकडे तक्रार दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, राजूरा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीमार्फत चौकशी करण्यात येऊन चौकशी अहवाल दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास उपनिबंधकांकडे सादर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकशी अहवालानुसार दोषीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

(२) होय,

(३) सदर संस्थेचे फेरलेखापरिक्षण अहवालानुसार संस्थेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याने दिनांक ३०.१०.२०१३ रोजी पोलीस स्टेशन कोरपणा येथे FIR दाखल केला आहे. कलम ८३ नुसार प्राप्त झालेल्या दिनांक ३०.०९.२०१५ रोजीच्या चौकशी अहवालानुसार आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये सहाय्यक निबंधक (प्रशासन) यांच्या मार्फत चौकशी चालु आहे.

(४) कार्यवाही चालु आहे.

-----------------

## मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नॉन बँकिंग फायनान्सकडून देण्यात येणाऱ्या कर्ज पुरवठ्याबाबत

**(७६) * १६५१९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नॉन बँकिंग फायनान्सकडून जादा दराने कर्ज पुरवठा केला जातो,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकबाकीदार शेतकऱ्यांकडून दंडवसुलीच्या नावाखाली रक्कम वसूल करण्यासाठी दबाव टाकल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या फायनान्स कंपन्यांवर आंध्र, कर्नाटक व तामिळनाडू या राज्य शासनाने बंदी केली आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून अशी बंदी आणली जाणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा प्रकारची जादा दराच्या कर्ज पुरवठ्याबाबतची तक्रार अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) शहरातील जिनिंग व्यापाऱ्यांनी ढेपीचा केलेला काळा बाजार

**(७७) * १७३९२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) शहरातील जिनिंग व्यापाऱ्यांनी ढेपी खरेदी करुन गोडाऊनमध्ये ठेवल्याने ढेपीचा तुटवडा निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून ढेपीचा काळा बाजार होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) आर्णी, जि.यवतमाळ येथे खाजगी जिनिंग-प्रेसिंगची चार युनिट्स असून त्यापैकी १ बंद स्थितीत आहे, तर उर्वरीत तीन युनिट्स पैकी एक युनिटची खाजगी ऑईल मिल व गोडाऊन आहे. त्यांच्या ऑईल मिल मध्ये सरकीपासून तेल काढल्यानंतर उरणाऱ्या ढेपी त्यांच्याच गोडाऊन मध्ये ठेऊन तेथून त्याची विक्री होते.

-----------------

## भटक्या विमुक्तांना व बारा बलुतेदारांना क्रीमिलीयर सज्ञे मधून वगळण्याबाबत

**(७८) * १४६३३ श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ११४३६ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भटक्या विमुक्तांना व बारा बलुतेदारांना क्रीमिलीयर संज्ञेमधून वगळण्याबाबत नागपूर २०१५ च्या अधिवेशनात विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात मा मंत्री.महोदयांनी याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या समोर सादर करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे म्हटले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भटक्या विमुक्तांना व बारा बलुतेदारांना क्रिमिलीअर संज्ञेमधून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अधिवेशन संपूर्ण २-३ महिने होऊनही याबाबतीत काहीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) भटक्या विमुक्तांना क्रिमिलेअर संज्ञेमधून वगळण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ठेवी खामगांव जनता कमर्शियल को.बँकेतून काढून राष्ट्रीकृत बँकेत टाकण्याबाबत**

**(७९) * १६६१३ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे पैसे हे खामगांव जनता कमर्शियल को.बँकेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बँकेने आर्थिक गैरव्यवहार केले असल्यामुळे या बँकेवर रिजर्व बँकेने आर्थिक निर्बंध लावलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खामगांव जनता कमर्शियल को.बँकेत काही प्रमाणात व्यवहार सुरु केले असल्यामुळे बाजार समितीच्या ठेवी या बँकेतून तात्काळ काढून घेवून राष्ट्रीकृत बँकेत टाकणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत संबंधित विभागाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) होय, भारतीय रिझर्व्ह बँकेने दि जनता कमर्शियल को.ऑप.बॉंक, खामगांव वर काही निर्बंध घातले होते. तथापि, सदर निर्बंध दिनांक २६/८/२०१५ पासून शिथिल करण्यात आले असून बँकेचे व्यवहार पुर्ववत सुरु आहेत.
(३) नाही, या बँकेकडे ठेवण्यात आलेल्या बाजार समितीच्या ठेवी बँकेने यापुर्वी व्याजासह बाजार समितीस परत केल्या आहेत. तसेच रु.५.७७ कोटीच्या ठेवीची मुदत अद्याप पुर्ण झालेली नसल्यामुळे सदर ठेवीची मुदत संपुष्टात आल्यानंतर व्याजासह परत करण्यात येणार असल्याने बँकेने बाजार समितीस कळविले आहे.

(४) ठेवीची मुदत संपुष्टात आल्यानंतर जर बँकेकडून सदर रक्कम परत मिळाली नाही. तर याबाबत तत्कालीन संचालक मंडळ सचिव यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे आदेश पणन अधिनियमातील तरतुदीप्रमाणे बाजार समितीस देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील रस्त्यांचे बांधकाम व दूरव्यवस्थेबाबत**

**(८०) * १७१०७ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील रस्त्यांचे बांधकाम व डागडुजी, खड्डे बुजविणे, झुडपे तोडणे इत्यादी कामासाठी दरवर्षी सार्वजनिक बांधकाम विभाग कोट्यावधी रुपयांचा खर्च करीत असूनही प्रत्यक्षात दोन/तीन वर्षे लोटूनही रस्त्यावरील खड्डे मात्र कायमच असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुरुस्तीच्या नावावर अधिकारी लाखो रुपयांचा गैरव्यवहार करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत असून सदरील अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी, अशी येथील जनतेकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ या वर्षी प्रजिमा व राज्यमार्गावरील डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरणेचे काम डिसेंबर, २०१५ अखेर पूर्ण करण्यात आलेले असून रस्ते वाहतुकीकरीता सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त राज्य शासनातर्फे नवीन शासकीय वसतिगृहे सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(८१) * १७१६९ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक १२२९० ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त राज्य शासनातर्फे यंदाचे वर्ष समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यात येत असून त्यानिमित्त राबविण्यात यावयाच्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील मागासवर्गीय मुलींसाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून ५० नवीन शासकीय वसतिगृहे सुरु करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहे कोणत्या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत व यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,

(३) उक्त वसतिगृहासाठी प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे व उर्वरित निधी किती कालावधीत उपलब्ध करून देण्यात येणार आहे व वसतिगृहांच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय,

शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, दिनांक १६/१२/२०१५ अन्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त राज्यात मागासवर्गीय मुलींसाठी नवीन ५० शासकीय वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) सदर वसतिगृहांपैकी २५० क्षमतेची विभागीय स्तरावर ७ वसतिगृहे व निवड केलेल्या विविध ठिकाणी १०० क्षमतेची ४३ वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. सदर ५० वसतिगृहांकरीता रु.२०.०० कोटी मंजूर करण्यात आले आहेत.

(३) सदर वसतिगृहांकरीता १४ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. प्रस्तावित वसतिगृहे शासकीय जमीन उपलब्ध होईपर्यंत भाडेतत्वावरील इमारतीत सुरू करण्यात येणार असून वसतिगृहांसाठी शासकीय जमीन उपलब्ध होईल त्यानुसार वसतिगृह इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागरी बँकाकडून शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(८२) * १७२७१ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील ४-५ वर्षात हवामानातील बदलामुळे राज्यात वांरवार दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली असताना व सन २०१५ च्या खरिप हंगामातील पर्जन्यमान असमाधानकारक झाल्याने दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमिवर शेतकऱ्यांच्या पिककर्ज घेण्याकडे कल वाढला असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षाच्या तुलनेत राज्यातील बँकांनी खरिप हंगामासाठी वाटप केलेले कर्ज फक्त ६० टक्केच्या आसपासचा होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सततची दुष्काळी परिस्थिती व आर्थिक चणचण यामुळे शेतकऱ्यांच्या पिककर्ज घेणे व पिकांचा विमा उतरविणे याकडे कल वाढलेला असतानासुध्दा नागरी बँकाकडून अद्यापही शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा बँकामार्फत कर्ज वाटप करण्यात येत असेल तर उद्दिष्टाप्रमाणे संपूर्ण कर्ज वाटप होत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कर्ज वितरण प्रक्रियेवेळी अतिरिक्त यंत्रणा उपलबध नसल्यामुळे बरेचसे शेतकरी कर्जापासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पिककर्ज वाटप, पिकविमा इत्यादी वाढीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

खरीप २०१४ च्या तुलनेत खरीप २०१५ मध्ये रु. ५५४० कोटीचे अधिक (२३ %) कर्जवाटप करण्यात आले आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) नाही, हे खरे नाही.

(५) नाही, हे खरे नाही.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांकडून विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेंमार्फत शेतक-यांना कर्जवाटप करण्यात येत आहेत.

(६) मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. २७/०५/२०१५ च्या कृषी खरीप आढावा व दि. २४/०६/२०१५ च्या राज्यस्तरीय बॅंकर्स समितीमध्ये मा. मुख्यमंत्री तसेच सचिव स्तरावरुन विविध आढावा बैठकीत यांनी राज्यातील सर्व बॅंकांना शेतक-यांना कर्जपुरवठा करण्याच्या सूचना केलेल्या आहेत.

(७) विलंब झालेला नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.